# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२१

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

### देवणी (जि.लातूर) पोलिस वसाहतीतील अधिकारी/कर्मचारी यांच्या निवासस्थानाचे बांधकाम करणेबाबत

**(१) ७७० (२७-०३-२०२०). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवणी (जि.लातूर) पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी पोलिस वसाहत आहे परंतु या वसाहतीतील निवासस्थानाची अवस्था अत्यंत बिकट झाली असून तेथील वसाहत परिसरात काटेरी, झुडपे, कचरा घाणीचे साम्राज्य मोठया प्रमाणात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देवणी येथील पोलिस ठाणे परिसरात ३० ते ३५ वर्षापूर्वी पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी १८ निवासस्थाने बांधण्यात आली परंतु सध्या ही निवासस्थाने अत्यंत छोटी असून गेल्या पाच वर्षापासून ही इमारत मोडकळीस आली आहे तसेच काही इमारतींना तडे गेले असून पावसाळयात गिलावा, गळती होणे तसेच तेथील झुडपामुळे साप, घुस,विंचू अशा प्राण्यांचा वावर वाढल्याचे दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या वसाहतीच्या समस्याबाबत वरिष्ठ अधिकारी यांना कळविले असून या समस्या संदर्भात लवकरच निर्णय होईल अशी माहिती तेथील पोलिस निरीक्षक सी.एस.कामठेवाड यांनी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) सदर पोलिस वसाहतीतील पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पोलिस निवासस्थानाचा प्रश्न शासन किती दिवसात निकालात काढणार आहे ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२३-११-२०२१) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) होय. हे खरे आहे.

(३) होय. हे खरे आहे.

(४) सदरचे निवासस्थाने टाईप-१ ची असून राहणेस अपुरे पडत आहे. सदर निवासस्थाने मोडकळीस आलेली आहेत. पोलीस अधिक्षक, लातूर यांच्याकडून कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, निलंगा यांना पत्रव्यवहार करण्यात आला आहे. सदरचा प्रस्ताव प्राप्त होताच प्राधान्यक्रम व निधी उपलब्धतेनुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(५) पोलीस अधिक्षक, लातूर यांचेकडून प्रस्ताव प्राप्त होताच पुढील प्राधान्यक्रम व निधी उपलब्धतेनुसार कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

---

**औसा विधानसभा मतदार संघातील अनेक गावात सार्वजनिक स्मशानभूमीसाठी जमीन संपादित करणेबाबत**

**(२) १०९३ (१३-०४-२०२०).** : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा, विधानसभा मतदार संघातील अनेक गावात सार्वजनिक दहन व दफन भूमी नसल्याने सदरील गावातील भूमिहीन व सर्व सामान्य नागरिकांची अंत्यविधी साठी गैरसोय होत असल्याने सदरील गावात सार्वजनिक स्मशानभूमीसाठी जमीन संपादनासाठीचा प्रस्ताव सादर करून प्रत्येक गावास एक सार्वजनिक दफन व दहन भूमी निर्माण करून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी औसा यांनी माहे डिसेंबर, २०१९ मध्ये औसा व निलंगा तहसील कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत तसेच दिनांक १० जानेवारी, २०२० रोजी मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या औरंगाबाद येथे झालेल्या आढावा बैठकीत मागणी केली आहे हे खरे आहे ,

(२) असल्यास, याबाबत तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश मा.मुख्यमंत्री महोदयांनी प्रशासनास दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, औसा मतदार संघातील गावात स्मशानभूमी साठी जमीन संपादनाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (१०-११-२०२१) :** (१)होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) औसा तालुक्यातील गावनिहाय दहन व दफन भूमीचा आढावा घेण्यात आला असून तालुक्यातील १३३ महसुली गावावापैकी ११८ गावांमध्ये सार्वजनिक दहन व दफन भूमीसाठी जागा उपलब्ध आहेत. १५ गावांमध्ये दहन व दफन भूमीसाठी जागा उपलब्ध नसल्याने जागा उपलब्धतेसाठी नव्याने प्रस्ताव जिल्हाधिकारी यांनी मागविले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वाघेरी (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) गावातील रस्त्यास १४ लाख रुपये रकमेच्या विकास कामांना जिल्हा वार्षिक योजना सन २०१९-२० अंतर्गत मंजूरी दिल्याबाबत**

**(३) १५४६ (१६-०४-२०२०). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाघेरी (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) गावातील कुळाचीवाडी गणपती साना रस्त्यासाठी ६ लाख रुपयांचा निधी व वाघेरी लिंगेश्वर मंदिराकडे जाणा-या रस्त्यास ५ लाख रुपये व वाघेरी रस्त्यास ३ लाख असे एकूण १४ लाख रुपये रकमेच्या विकास कामांना जिल्हा वार्षिक योजना (जन सुविधा) सन २०१९-२० अंतर्गत मंजूरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्त्यांची कामे पूर्ण होण्याच्या दृष्टीनी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (१०-११-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर तीन कामे जिल्हा वार्षिक योजना जनसुविधा योजनेमधून (सन २०१९-२०) मंजूर असून वाघेरी (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) गावातील कुळाचीवाडी गणपती साना रस्ता (रक्कम रु.६ लाख) हे काम निविदा स्तरावर आहे. उर्वरित दोन कामांच्या नावात जिल्हा नियोजन विभागाकडून बदल करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**२५१५ योजनेमधील स्थगिती उठविणेबाबत**

**(४) २३६५ (१२-०४-२०२०). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने कोणत्याही योजनेला स्थगिती दिली नाही व दिली असल्यास उठविण्यात येईल असे आश्वासन मा. मुख्यमंत्री यांनी माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आश्वासन देवून सुद्धा २५१५ या ग्रामपंचायतमधील मुलभूत सुविधांशी संबंधित लेखाशिर्षाखाली शासनाकडून मंजूर झालेल्या कामांना स्थगिती उठविण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू आश्वासनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (११-११-२०२१) :** (१) अशी बाब नाही. लेखाशीर्ष २५१५ १२३८ (मा. लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत मुलभूत सुविधा पुरविणे) योजनेतील कामांच्या स्थगिती उठविण्याबाबत उल्लेख दिसून येत नाही.

(२) सन २०१९-२० या आर्थिक वर्षात मा. लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या गावातर्गत मुलभूत सुविधा या योजनेमधील सरसकट सर्व कामांना स्थगिती न देता, ज्या कामांना कार्यारंभ आदेश दिले नाही, अशी कामे दि.४/१२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये शासन मान्यतेने स्थगित करण्यात आली होती.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लोकप्रतिनिधीनी सुचविलेल्या सन २०१८-१९ व २०१९-२० मधील**
**विकास कामांचे देयके देण्यात येत नसल्याबाबत**

**(५) २६७५ (१५-०४-२०२०). श्री.नामदेव ससाने (उमरखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोकप्रतिनिधीनी सुचविलेल्या सन २०१८-१९ व २०१९-२० मधील विकास कामांचे देयके देण्याबाबत अकोला पंचायत विभाग, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. राजू फडके व संबधित

विस्तार अधिकारी श्री. पुंडलिक दुधे हे जाणीवपूर्वक मानसिक व आर्थिक त्रास देत असल्याबाबतची तक्रार अकोला जिल्हा परिषद कॉन्ट्रक्टर्स अँड इंजिनिअर्स असोसिएशन, अकोला यांनी दिनांक १० जानेवारी, २०१९ रोजी च्या सुमारास ग्रामविकास मंत्री, यांच्याकडे केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (२६-११-२०२१) :** (१), (२) व ३) लेखाशीर्ष २५१५ १२३८ अंतर्गत सन २०१९ मध्ये एल आर एस प्रणालीद्वारे देयके अदा करण्यात येत होती. सध्या देयके एल. पी. आर. एस. प्रणालीवर अदा केली जातात. जिल्हा परिषद, अकोला यांच्याकडे प्राप्त देयके विहित कालावधीत बांधकाम विभागाकडे तांत्रिक तपासणी साठी सादर करण्यात येतात. माहे, फेब्रुवारी, २०२० मध्ये जिल्हा परिषद, अकोला यांच्याकडे एल आर एस प्रणालीवर कोणतेही देयक प्रलंबित नव्हते. तसेच प्रश्नभाग मुद्दा क्र. १ मध्ये उल्लेख केलेले अधिकारी/ कर्मचारी दिनांक १०.१.२०१९ या कालावधीमध्ये पंचायत विभाग, जिल्हा परिषद, अकोला येथे कार्यरत नव्हते.

तसेच, लेखाशीर्ष २५१५ १२३८ अंतर्गत अकोला जिल्ह्यातील सन २०१७-१८ आणि २०१८-१९ मधील कामांची प्रलंबित देयके दोन टप्प्यामध्ये अदा करण्यात आली आहेत. सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील कामांबाबत दिनांक २६ मार्च, २०२१ रोजी प्राप्त मागणीनुसार निधी मंजूर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य गुप्तवार्ता विभागात नियुक्ती झालेल्या ४२ उमेदवारांनी भरती होण्यास नकार दिल्याबाबत

**(६) २७०९ (२२-०३-२०२०). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील २६/११ च्या हल्ल्यानंतर पोलीस सक्षमिकरणांतर्गत सुरक्षा व्यवस्था व सामुग्रीमध्ये अमुलाग्र बदल करुन राज्यातील गुन्हेगारी बरोबरच राजकीय, सामाजिक घडामोडीवर लक्ष ठेवण्याची जबाबदारी असलेल्या राज्य गुप्तवार्ता विभागास सक्षम करण्यासाठी विभागात सहाय्यक गुप्तवार्ता अधिकारी म्हणून नियुक्त झालेल्या ४२ उमेदवारांनी भरती होण्यास नकार दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उमेदवारांनी भरतीस नकार देण्याची कारणे काय आहेत व आरक्षणानुसार अनुसूचित जमाती प्रवर्गातून किती महिला उमेदवारांची निवड करण्यात आली आहे,

(३) असल्यास, सहाय्यक गुप्तवार्ता अधिकारी म्हणून रिक्त असलेल्या पदांवर तातडीने नवीन उमेदवारांची भरती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१८-११-२०२१) :** (१) व (२) होय

राज्यगुप्तवार्ता विभागामार्फत आयोजीत करण्यात आलेल्या सहाय्यक गुप्तवार्ता अधिकारी या पदासाठी भरती प्रक्रियेतील एकुण २०३ उमेदवारांची निवड यादी प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार सदर उमेदवारांना प्रशिक्षणासाठी हजर राहण्याबाबत नियुक्ती आदेश पाठविण्यात आले होते. त्यापैकी ४२ उमेदवार यांची इतर विभागात निवड झाल्याने त्यांनी सहाय्यक गुप्तवार्ता अधिकारी पदावर रूजू होण्यास लेखी स्वरूपात नकार दिला आहे.

सदर भरती प्रक्रियेत आरक्षणानुसार अनुसूचित जमाती महिला प्रवर्गातून ०५ महिला उमेदवारांची निवड करण्यात आली आहे.

(३) सदर ४२ उमेदवारांनी नियुक्ती नाकारल्याने त्यांच्या रिक्त जागी प्रतिक्षा यादीतील उमेदवारांची निवड करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आखाडे (ता.जावळी, जि. सातारा) ग्रामपंचायतीच्या झालेल्या महासभेच्याा बैठकीत गावठाण्यात स्मशानभूमी इमारत बांधणे व इतर विषयांबाबत**

**(७) ३८८३ (१६-०४-२०२०). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आखाडे (ता.जावळी, जि. सातारा) ग्रामपंचायतीने दिनांक २२ नोव्हेंबर, २०१९ रोजी झालेल्या महासभेच्याा बैठकीत अ) आखाडे गावठाण्यात स्मशानभूमी इमारत बांधणे- स्मशानभूमीकडे जाणा-या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे, ब) आखाडे गावठाण मुख्य रस्त्याला जोडण्यासाठी नवीन सुमारे दीड कि.मी. अंतराचा नवीन रस्ताम तयार करणे व क) आखाडे (कुडाळ-पाचगणी रोड) ते गावठाण रस्ता संरक्षण भींत बांधणे आदी ठराव पारित करुन सदरहू मागण्याचे निवेदन पालकमंत्री, सातारा जिल्हा, मा. महसूल मंत्री, मा.ग्रामविकास मंत्री,जिल्हाधिकारी, सातारा,मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., सातारा, आदींकडे सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागण्यांबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (२६-११-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे. याबाबत ग्रामपंचायतीने दि. २२.११.२०१९ च्या बैठकीत दोन कामांचे ठराव पारित केले आहेत व याबाबत मा. लोकप्रतिनिधींमार्फत मा. मुख्यमंत्री महोदयांना निवेदन दिलेले आहे. परंतु, सदर मागण्यांचे निवेदन मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. सातारा व जिल्हाधिकारी, सातारा यांचेकडे देण्यात आलेले नाही.

(२) जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत जनसुविधांसाठी विशेष अनुदान या योजनेंतर्गत आखाडे, ता. जावळी येथे स्मशानभूमी शेड बांधणे (रक्कम रु. ३.०० लक्ष) या कामास मान्यता मिळाली असून काम प्रगतीत आहे. तसेच जिल्हा वार्षिक योजना आराखड्यामध्ये आखाडे गावठाण ते जुने गावठाण आखाडे रस्ता ग्रामीण मार्ग क्र. ५५ समाविष्ट आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जालना जिल्हयातील भोकरदन-जाफ्राबाद येथील सन २०१८-१९ या वर्षात मंजुरी प्रदान करण्यात आलेल्या विविध विकासकामांना देण्यात आलेली स्थगिती उठवण्याबाबत**

**(८) ३९७९ (१२-०४-२०२०). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हयातील भोकरदन-जाफ्राबाद येथील सन २०१८-१९ या वर्षात मंजुरी प्रदान करण्यात आलेल्या, २५१५ या लेखाशीर्ष खाली योजनेतील विविध विकासकामांना देण्यात आलेली स्थगिती उठवण्यात यावी, या मागणीसाठी लेखी निवेदन माहे जानेवारी २०१९ मध्ये वा त्यादरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, मंत्री (वित्त व नियोजन), मंत्री (ग्रामविकास) यांच्याकडे सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू विकासकामे विभागाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची तसेच स्थानिक जनतेच्या सर्वांगीण हिताची असल्याने ती वेळेत पूर्ण न झाल्यास जनतेत असंतोष पसरू शकतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१०-११-२०२१) :** (१)अंशत: खरे आहे. सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात ज्या कामांचे कार्यारंभ आदेश दिले गेले नाहीत, केवळ अशी कामे दिनांक २६.२.२०२० रोजीच्या पत्रान्वये रद्द करण्यात आली आहेत.

(२) व (३) सन २०१८-१९ या वर्षातील ज्या कामांना कार्यारंभ आदेश दिला, अशी कामे पूर्ण झाल्यावर निधीसुद्धा अदा करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील मेळघाटातील आरोग्य यंत्रणेच्या समस्यांबाबत**

**(९) ६७१७ (१३-०४-२०२०). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील मेळघाटातील आरोग्य व्यवस्थेतील शासनाकडून दरवर्षी कोटयावधी रुपयांचा निधी मिळत असला तरी अजूनही पायाभूत सुविधांपासून वाहनापर्यंतची स्थिती दयनीय असल्याचे दिनांक १२ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, येथे कर्मचाऱ्यांची कमतरता, कर्मचाऱ्यांनी सेवेवर हजर न राहणे, भरारी पथकासाठी वाहने उपलब्ध नसणे, त्यामध्ये इंधन नसणे अशा अनेक समस्यां येथील आरोग्य यंत्रणेमध्ये आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, यामुळे मेळघाटातील आरोग्यसेवेचा आढावा घेवून येथील आरोग्य यंत्रणेतील समस्या सोडविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अदयाप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (१६-११-२०२१) :** (१) नाही,हे खरे नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.
प्राथमिक आरोग्य पथक व फिरते आरोग्य पथकातील काही पदे रिक्त आहेत परंतु वाहने, इंधनाच्या समस्या नाहीत.
(३) मेळघाटातील आरोग्य सेवा अधिक संवेदनशिलपणे हाताळून आरोग्य यंत्रणेतील समस्या सोडविण्यासाठी नोडल अधिका-यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या असुन त्याच्या मार्फत दरमहा कामाचा आढावा घेण्यात येतो.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**मुखेड (जि. नांदेड) तालुक्यात सिताफळ संशोधन व प्रक्रीया उद्योग केंद्र उभारण्याबाबत**

**(१०) ९८२८ (०५-०६-२०२०). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुखेड (जि. नांदेड) मतदारक्षेत्रासह लातूर, बीड व उस्मानाबाद या जिल्ह्यांत सीताफळाचे उत्पादन मोठया प्रमाणात होत असून मराठवाड्यात सिताफळ संशोधन व प्रक्रिया उद्योग केंद्र नसल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुखेड तालुक्यात उच्च प्रतीच्या सीताफळांचे उत्पन्न होत असुन सीताफळ नाशवंत असल्याने त्याच्यावर प्रक्रिया करण्याची कुठलीच सोय नसल्यामुळे कमी किंमतीने बाजारात विकले जात असल्याने त्याचे मूल्यवर्धन झाल्यास स्थानिकांना त्याचा लाभ होऊन उत्पन्ननाचे स्त्रोत वाढवण्यास मदत होईल, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुखेड तालुक्यात सिताफळ संशोधन व प्रक्रिया उद्योग उभारण्याबाबत लोकप्रतिनिधीनी दिनांक ८ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुखेड तालुक्यात सिताफळ संशोधन व प्रक्रिया उद्योग केंद्र उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दादाजी भुसे (२४-११-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३) होय
मुखेड तालुक्यामध्ये सिताफळ प्रक्रिया प्रकल्प स्थापन करणेबाबतचा डॉ.तुषार राठोड (मुखेड) वि.स.स. यांचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडून दि.०३.११.२०१८ च्या पत्रान्वये कृषि आयुक्त कार्यालयास प्राप्त झाला होता.
(४) मुखेड (जि.नांदेड) मतदार क्षेत्रासह लातूर, बीड व उस्मानाबाद या जिल्ह्यात सीताफळाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असून वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांचे अधिनस्त अंबाजोगाई, जि. बीड येथे सिताफळ संशोधन केंद्र येथे कार्यान्वित आहे.

फलोत्पादन उप विभागाची पूर्णत: शासनामार्फत प्रक्रिया उद्योग उभारण्याबाबतची योजना नाही. एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान, मुख्यमंत्री कृषि व अन्न प्रक्रिया उद्योग योजना या योजनांतर्गत प्रक्रियेसंदर्भात वैयक्तिक लाभार्थ्यांना योजनेतील तरतुदीनुसार अनुदान उपलब्ध करुन देण्याची तरतूद आहे. तसेच 'एक जिल्हा एक उत्पादन (ODOP) या धर्तीवर आधारित केंद्र सहाय्यित प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना" या योजनेंतर्गत प्रक्रियेसाठी मराठवाड्यातील बीड जिल्ह्याचा सिताफळ (Custered Apple) या फळपिक प्रक्रियेसाठी समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार प्रस्ताव प्राप्त झाल्यास सिताफळ प्रक्रिया केंद्र उभारण्याबाबतच्या प्रस्तावास योजनेतील तरतुदीनुसार मान्यता देऊन अनुज्ञेय अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिंधुदुर्ग जिल्हा रुग्णालयातील नर्सच्या व लहान मुलांच्या जिविताशी खेळणा-या जिल्हा शल्य चिकीत्सक, सिंधुदुर्ग यांच्यावर कारवाई करणेबाबत.

**(११) ११४०७ (१४-०९-२०२०). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना विषाणूचा प्रादूर्भाव वाढला असून जे कर्मचारी आपले जीव धोक्यात घालुन कोरोना रुग्णांवर उपचार करित आहेत या कर्मचा-यांच्या व नर्सच्या सुरक्षेकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंधुदुर्ग जिल्हा रुग्णालयातील  नर्सने पंधरा दिवस कोरोना वॉर्डमध्ये काम केल्या नंतर तीची कोवीड तपासणी केल्यानंतर तीन दिवस कोवीड सूट्टी पूर्ण झाल्यावर तीचा कोविड रिपोर्ट येण्याअगोदरच सदर नर्सला लहान मूलांच्या वॉर्डमध्ये काम करायला लावले. परंतु या नर्सचा कोविड रिपोर्ट हा पॉझीटिव्ह आला असल्याने लहान मुलांच्या तसेच त्यांच्या संबंधात येणा-या इतर नागरिकांच्या जिविताला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिनी मा.आरोग्य मंत्री यानां निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत श्री.धनंजय चाकूरकर, जिल्हा शल्य चिकीत्सक,सिंधूदूर्ग  यांच्यासह यासंबधी  जे  दोषी असतील त्याच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (१६-११-२०२१) :** (१) हे खरे नाही

(२) हे खरे नाही.

तथापि, कोविड कक्षातील कर्तव्यानंतर बंधपत्रित अधिपरिचारीका यांना दि. २४ ते २७ मे, २०२० रोजी सुट्टी देण्यात आली. दि.२८ मे २०२० रोजी त्यांना बाहरुग्ण कक्षात तेथे रुग्ण नसल्याने अहवाल लिखानाचे कामकाज देण्यात आले होते.  तर दि. २९ व ३० मे, २०२० रोजी त्यांना सुट्टी देण्यात आली होती. दि. ३० मे, २०२० रोजी रिपोर्ट प्राप्त झाल्यानंतर त्यांना

रुग्णालय विलगीकरणात ठेवण्यात आले होते. त्यानंतर त्यांचे गृहविलगीकरण करण्यात आले. त्यांच्यामुळे लहान मुले व नागरीकांच्या जिविताला धोका उत्पन्न झालेला नाही. कारण त्या त्यांच्या संपर्कात आलेल्या नाहीत.

(३) हे खरे नाही.

सदरचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.

(४) व (५) प्रश्न उदभवत नाही.

---

**चांडोली ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टरांच्या गैरवर्तनाबाबत.**

**(१२) ११५६६ (१६-०९-२०२०). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांडोली ग्रामीण रुग्णालयातील ८ डॉक्टरांपैकी एक डॉक्टर उपस्थित असून उपस्थिती मात्र सर्व डॉक्टरची दाखविण्यात येत असल्याचे माहे एप्रिल २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना विषाणू (कोविड १९) अति संसर्ग असल्याने उपाययोजना म्हणून राज्यात साथरोग अधिनियम १८९७ या कायद्याचे चांडोली येथील डॉक्टर व प्रशासनाने उल्लंघन केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणासंदर्भात चांडोली येथील वैद्यकीय अधीक्षक यांना अहवाल सादर करण्याचे वरिष्ठानी निर्देश देऊन ही अहवाल सादर करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्याअनुषंगाने संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (१६-११-२०२१) :** (१) हे खरे नाही.

ग्रामीण रुग्णालय (चांडोली), राजगुरुनगर व ट्रामा केअर (चांडोली), राजगुरुनगर ता. खेड येथे वैद्यकीय अधिकारी गट-अ ची ८ पदे मंजूर असून सर्व पदे भरलेली आहेत. या ८ वैद्यकीय अधिकाऱ्यांपैकी ३ वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सेवा कोविड-१९ अंतर्गत इतरत्र वर्ग करण्यात आलेल्या असून, १ वैद्यकीय अधिकारी हे अनधिकृत रजेवर आहेत. कार्यरत ४ वैद्यकीय अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या हजेरी पुस्तकात आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिकेतील मगील अनेक वर्षांपासून बेपत्ता नगर रचनाकार श्री. संजीव करपे यांच्या खोट्या सह्या करून बांधकाम परवानग्या दिल्याबाबत**

**(१३) १३६११ (२०-०९-२०२०). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिकेतील अनेक वर्षांपासून बेपत्ता असलेल्या नगररचनाकार श्री. संजीव करपे यांच्या बनावट सह्या करून बांधकाम परवानग्या दिल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय निदर्शनास आले, तदनुसार बनावट सहया प्रकरणी महानगरपालिकेच्या नगररचना विभागातील अधिकारी, कर्मचारी व विकासक यांची पोलीसांकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास दोषी आढळून आलेल्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-११-२०२१) :** (१), (२), (३) व (४) मागील अनेक वर्षांपासून बेपत्ता असलेले उल्हासनगर महानगरपालिकेतील तत्कालीन नगररचनाकार श्री. संजीव करपे यांची बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र व नकाशावरील स्वाक्षरी बनावट असल्याबाबत दिनांक ०१.०३.२०२० रोजी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने, नगररचनाकार श्री. संजीव करपे यांची स्वाक्षरी योग्य आहे किंवा नाही याची पडताळणी करुन पडताळणीचा अहवाल सादर करणेबाबत केंद्रीय न्यायवैद्यकीय प्रयोगशाळा, पुणे यांना दिनांक १८.०८.२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर योग्य व आवश्यक कारवाई करण्यात येईल असे उल्हासनगर महानगरपालिकेने कळविले आहे.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिकेमध्ये अस्तित्वात नसलेल्या शिक्षण विभागातील उप लेखाधिकारी पदावर नियुक्ती दिल्याबाबत**

**(१४) १३६१५ (२०-०९-२०२०). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिकेमध्ये अस्तित्वात नसलेल्या शिक्षण विभागातील उप लेखाधिकारी या पदावर अवैध, नियमबाह्य व बेकायदेशिरपणे श्रीमती नीलम कदम बोडारे यांना नियुक्ती दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय निदर्शनास आले, नियमबाह्य व बेकायदेशिरपणे उपलेखापाल पदावर नियुक्ती देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच श्रीमती नीलम कदम बोडारे यांनी या पदावरून घेण्यात आलेल्या अधिकच्या फायद्याची वसुली करून त्यांना पदावनत करण्यात आले आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-११-२०२१) :** (१) हे खरे नाही असे उल्हासनगर महानगरपालिकेने कळविल आहे.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही असे उल्हासनगर महानगरपालिकेने कळविले आहे.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) येथील वालधुनी नदीवरील सुमारे ५० वर्षाहून अधिक वर्षाचा जूना पुल धोकादायक झाल्याबाबत**

**(१५) १५४५८ (२०-११-२०२०). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील वालधुनी नदीवरील सुमारे ५० वर्षाहून अधिक वर्षाचा जूना पुल धाेकादायक झाला असून या पुलाची विनाविलंब पुर्नबांधणी करण्यात यावी अशा आशयाची मागणी नगरसेवक श्री.सिरवाणी, श्री.शेळके व तेथील नागरिकांनी मा. नगरविकास मंत्री तथा पालकमंत्री तसेच उल्हासनगर महानगरपालिका प्रशासनाकडे मागील १ वर्षापासून सातत्याने लेखी निवेदन पाठवून केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उल्हासनगर महानगरपालिकेच्या गत वर्षीच्या अंदाजपत्रकात तसेच या वर्षाच्या अंदाजपत्रकातही पुनर्बांधणीसाठी आवश्यक त्या रक्कमेची तरतूद केलेली असतानाही आजमितीस सदरहू पूलाच्या पुनर्बांधणीचे काम होती घेण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार सदरहू धोकादायक पूलाच्या पुर्नबांधणीचे काम विनाविलंब करुन नवीन पूल वाहतुकीसाठी कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-११-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) सदर पुलाच्या लगत व परिसरात उल्हासनगर रेल्वे स्टेशन येथे एमएमआरडीए प्राधिकरणामार्फत स्कायवॉकचे काम सुरु करण्यात आले होते. सदर स्कायवॉकच्या कामाकरिता लागणारे सर्व साहित्य/मशिनरी यांची वाहतूक याच सबमर्सिबल पुलावरुन करण्यात येत होती. त्यामुळे सदर पुल तोडून काम सुरु करणे शक्य नव्हते. तद्‌नंतर स्कायवॉकचे काम पूर्ण करण्याकरिता एमएमआरडीए प्राधिकरणास बराच कालावधी लागला. या कारणास्तव सदर पुलाचे काम सुरु करणे शक्य झाले नाही.

सदर पुलाच्या बांधकामाकरिता रु. ४ कोटी इतक्या रकमेची तरतूद उल्हासनगर महानगरपालिकेच्या सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पात करण्यात आली असून, पुलाचे बांधकामाकरिता “ईपीसी” पध्दतीने निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. सदर निविदा प्रक्रिया पूर्ण होताच पुलाचे बांधकाम हाती घेण्यात येणार असल्याचे उल्हासनगर महानगरपालिकेने कळविले आहे.

---

**कृष्णूर (ता.नायगाव, जि.नांदेड) अन्न-धान्य घोटाळ्यातील आरोपी अदयाप फरार असल्याबाबत**

**(१६) १९५१७ (२४-११-२०२०). श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृष्णूर (ता.नायगाव, जि.नांदेड) धान्य घोटाळ्यातील मुख्य आरोपी व तसेच अटक वॉरंट जारी केलेले अनेक दोषी अधिकारी अदयाप फरार असल्याचे माहे जुलै-२०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस प्रशासनाला अद्याप फरार आरोपी न सापडण्याची तसेच या घोटाळयाचा तपास पूर्ण न होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या घोटाळ्यातील दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२२-११-२०२१) :** (१) उक्त प्रकरणातील महसुल विभागाचे एकमेव फरार अधिकारी आरोपी संतोष वेणीकर (तत्कालीन पुरवठा अधिकारी नांदेड) हे गुन्हा दाखल झाल्यानंतर मागील एक ते दिड वर्षापासून फरार असून त्यांचे विरुद्ध लुक आऊट नोटीस जारी करण्यात आली आहे. तसेच सी.आर.पी.सी. १९७३ चे कलम ८२, ८३ अन्वये कार्यवाही होणेबाबत मा. न्यायालयात अहवाल सादर करण्यात आला आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी फरार आरोपी संतोष वेणीकर यांचे विरुद्ध लुक आऊट नोटीस जारी करण्यात आली आहे. तसेच एकूण २३ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यापैकी एकूण १९ आरोपींविरुद्ध दोषारोपपत्र दाखल व १ आरोपीविरुद्ध पुरवणी दोषारोपपत्र मा. न्यायदंडाधिकारी, प्रथमश्रेणी न्यायालय, नायगांव येथे दाखल करण्यात आले आहे. उर्वरित ३ आरोपींविरुद्ध मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे.

गुन्ह्याची व्याप्ती मोठ्या प्रमाणात असल्याने तपासात विलंब होत असून सदर प्रकरणात महसुल विभागातील अधिकारी / कर्मचारी, वाहतुक कामगार, ट्रेडींग कंपन्या, दलाल, अनेक ट्रकचालक, गावपातळीवरील रेशन दुकानदार यांचा समावेश असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

कृष्णूर (ता.नायगाव, जि.नांदेड) धान्य घोटाळ्या प्रकरणी पोलीस स्टेशन, कुंटूर, जि. नांदेड येथे गु.र.नं. १०९/२०१८ भा. दं. वि. कलम १६६, ४०९, ४२०, ४०६, ४६७, ४६८, ४७१, ४७७ (अ), १२० (ब) व ३४ सह अत्यावश्यक वस्तु कायदा कलम ३, ७ प्रमाणे दि.१९/०७/२०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**सोलापूर महानगरपालिकेच्यावतीने कोरोना काळात पल्स ऑक्सी मीटर आणि थर्मामीटर खरेदीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(१७) २०२५७ (२२-०३-२०२१). श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना महामारीच्या काळात सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने रुग्णांची तपासणी करण्यासाठी पल्स ऑक्सी मिटर आणि थर्मामिटर खरेदी करण्यात आले होते परंतु या दोन्ही वस्तूंची किंमत बाजारभावापेक्षा तीन पट जास्त रक्कम देऊन खरेदी करण्यात आले असून

त्याच बरोबर सिंहगड कोव्हीड सेंटरसाठी लाखो रुपयांची औषधे व साहित्य खरेदी करण्यात आले होते या खरेदी मध्येही मोठी तफावत दिसून येत असल्याने सदर खरेदीत लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे दिनांक २४ /११ /२०२० रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी औषध भंडारामधील साहित्यांची चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत काय, तसेच कोरोना औषध भांडारातून वितरित करण्यात आलेल्या साहित्यांची नोंद रजिस्टरमध्ये करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, या खरेदीबाबत बाजार मूल्य व खरेदी केलेल्या किंमतीची तपासणी करुन चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीअंती शासनाकडून कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-११-२०२१) :** (१) कोरोनाकाळात पल्स ऑक्सीमीटर आणि थर्मामीटर खरेदीत बाजारमुल्यापेक्षा जास्त दराने खरेदी केल्याचे वृत्त दिनांक २४/११/२०२० रोजी दैनिक दिव्यमराठी या स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध झाले होते.

(२) व (३)

• सोलापूर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात शहरवासियांना आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी ७ दवाखाने, ७ प्रसुतीगृहे व १५ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यान्वित आहेत.

• कोविड-१९ ही साथ पहिल्यांदाच उद्धभवल्याने सर्वत्र प्रशासनाकडून प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून तातडीने सर्व बाबी हाताळाव्या लागल्या. या प्राथमिक बाबीसह निदान व उपचार आणि प्रतिबंध याकरीता तातडीने विविध प्रकारची औषधे, साहित्य उपलब्ध करुन घेणे अत्यंत गरजेचे होते.

• त्यावेळी महानगरपालिकेकडे औषध भांडारमध्ये पल्स ऑक्सीमीटर व थर्मामीटर उपलब्ध नसल्याने कोविड-१९ च्या साथीचे निदान करण्यासाठी पल्स ऑक्सीमीटर व थर्मामीटर ची खरेदी महानगरपालिकेच्या अधिनियमातील ६७ (३) क अन्वये असलेल्या अधिकारांचा वापर करुन सक्षम मान्यतेने करण्यात आली असून ती वाजवी दराने करण्यात आली आहे, असे आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांनी कळविले आहे.

• कोरोना कालावधीत खरेदी करण्यात आलेल्या विविध साहित्य व औषधांची औषध भांडारमध्ये जावून चौकशी करण्याबाबत महानगरपालिकेचे लेखापरिक्षण विभागास आदेश देण्यात आले आहेत.

• याबाबत चौकशी महानगरपालिका स्तरावर करण्यात येत असल्याचे आयुक्त, महानगरपालिका सोलापूर यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय परीक्षा, २०१६ मध्ये अपात्र उमेदवारांची निवड केल्याबाबत

**(१८) २०२८९ (३०-०३-२०२१). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय परीक्षा, २०१६ मधील शिफारस यादी व्यतिरिक्त अपात्र ठरलेल्या ६३६ उमेदवारांची निवड करण्याचा निर्णय रद्द करून ही विभागीय परीक्षा नियमित घेण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याबाबत विधानसभा सदस्य यांनी दिनांक १९ नोव्हेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास शासनाकडे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय परीक्षा, २०१६ मधील पात्र यादी व्यतिरिक्त सदर परीक्षेत अपात्र ठरलेल्या ६३६ उमेदवारांची पोलीस उपनिरीक्षक पदी निवड करण्यात आली असून या परीक्षेनंतर पुढील वर्षी नव्याने परीक्षा घेऊन पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना पोलिस उपनिरीक्षक पदी नियुक्त करण्याऐवजी अपात्र ठरलेल्या ६३६ उमेदवारांना पोलिस निरीक्षक पदी नियुक्त करण्यात आले आहे तसेच त्यानंतर अद्याप पोलिस उपनिरीक्षक पद भरतीसाठी परीक्षा घेण्यात आली नसल्यामुळे परीक्षेची तयारी करणाऱ्या उमेदवारांवर अन्यायच होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून सदर परीक्षेमध्ये अपात्र ठरलेल्या ६३६ उमेदवारांची नेमणूक रद्द करण्यात यावी तसेच महाराष्ट्रातील युवकांच्या दृष्टीने पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय परीक्षा नियमित घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२९-११-२०२१) :** (१) होय.

(२) व (३) पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय परीक्षा, २०१६ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या ८२८ उमेदवारांना पोलीस उपनिरीक्षक पदाच्या प्रशिक्षणासाठी पाठविण्याची कार्यवाही पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून करण्यात आली होती.

दरम्यान पदोन्नतीतील आरक्षणाबाबत मा. उच्च न्यायालयाने दि.०४/०८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने, मागासवर्ग प्रवर्गासाठी राखीव असलेल्या जागांवर त्या-त्या प्रवर्गातील उमेदवारांना प्रशिक्षणासाठी पाठविण्यात आल्याच्या कार्यवाहीविरुध्द उद्‌भवलेल्या न्यायालयीन प्रकरणाच्या अनुषंगाने पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय परीक्षा सन २०१६ मधील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या शिफारस यादी व्यतिरिक्त २३० व त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त झालेल्या ६३६ उमेदवारांना पोलीस उपनिरीक्षक पदावर नियुक्ती देण्याबाबतचा शासन निर्णय दि. २२/०४/२०१९ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. या उमेदवारांना भविष्यात मर्यादित विभागीय परीक्षेच्या कोट्यात रिक्त होण्याऱ्या पदांवर टप्या-टप्याने सामावून घेण्याचे शासन निर्णयामध्ये नमुद करण्यात आले आहे.

श्री. गजानन बाबुलाल बनसोडे व इतर यांनी मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या सिव्हिल अपील क्र.१०४/२०२१ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.०५/०२/२०२१ रोजी सदर शासन निर्णयाला स्थगिती दिली असून ६३६ उमेदवारांना अद्याप नेमणूक देण्यात आलेली नाही. तसेच पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय परीक्षा २०२१ साठी २५० पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आले असून पुढील कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ऑल इंडिया इन्स्टिट्यूट लोकल सेल्फ गव्हर्नमेंट या संस्थेकडे असलेले कामकाज रद्द करण्याबाबत**

**(१९) २०३४२ (१८-०१-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीत वास्तव्यास असणाऱ्या विविध घटकांतील नागरिकांसाठी नागरवस्ती विकास योजना विभागातर्फे कल्याणकारी योजना 'ऑल इंडिया इन्स्टिट्यूट लोकल सेल्फ गव्हर्नमेंट' या संस्थेद्वारे राबविण्यात येत असून नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत कल्याणकारी योजनांच्या लाभार्थी अर्जाची छाननी करणाऱ्या उक्त संस्थेच्या कामात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत कल्याणकारी योजनांच्या लाभार्थ्यांना महानगरपालिका हद्दीतील आधार कार्ड, रेशनकार्ड, रहिवासी पुरावे नसतानाही प्रशिक्षण देण्यात आल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर संस्थेने कागदोपत्री बोगस लाभार्थ्यांच्या नावे प्रशिक्षण दिल्याचे दाखवून व महानगरपालिका हद्दीतील बोगस लाभार्थ्यांचे आधार कार्ड, रेशनकार्ड, रहिवासी पुरावे तयार करून लाखो रुपयांच्या निधीची महानगरपालिकेकडून देयके काढली तसेच, सामाजिक संस्था कार्यकर्ते यांनी पंडित दिनदयाळ उपाध्याय योजनेअंतर्गत प्रशिक्षणार्थी महिलांचे पुरावे व माहिती माहे नोव्हेंबर, २०२० च्या पहिल्या आठवड्यात मागणी करूनही सदर माहिती उपलब्ध करून देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर संस्थेच्या मागील ७ वर्षात छाननी केलेले अर्ज, दिलेले प्रशिक्षण व लाभार्थी यांची अद्यावत माहिती व चौकशीबाबत चिंचवड वि.स.स यांनी वारंवार लेखी पत्राद्वारे व मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांची भेट घेऊन लेखी तक्रार केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार सदर संस्थेमार्फत सुरु असलेले कामकाज रद्द करुन ते पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या औद्योगिक तंत्रशिक्षण संस्था (ITI) यांचेमार्फत करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-११-२०२१) :** (१), (२) व ३)

- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये राबविण्यात येत असलेल्या पंडीत दीनदयाल उपाध्याय या योजनेशी संबंधित माहिती नोव्हेंबर, २०२० मध्ये माहिती अधिकारांतर्गत मागविण्यात आली होती, हे खरे आहे.
- सदर अर्जदाराने समक्ष उपस्थित राहून अभिलेखांची तपासणी केली असून प्राप्त माहितीमुळे अर्जदाराचे समाधान झाले असल्याचे अर्जदाराने त्याच्या दि.०१.०३.२०२१ च्या पत्रात म्हटले आहे.
- तसेच स्थानिक नगरसेवक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी दि.२०.११.२०२० च्या पत्रान्वये "अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेबाबतची" माहिती, प्रशिक्षण घेतलेल्या महिलांच्या प्रशिक्षणासाठी अदा केलेली बिले व इतर तपशील माहिती अधिकारातंर्गत मागितला होता. विचारणा केलेल्या सर्व शंकांचे निरसन झाले असल्याबाबत त्यांनी दि.१६.०२.२०२१ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(४) व (५)

- मा.विधानसभा सदस्य, चिंचवड यांनी दि.१७/०४/२०१८ व दि.०४/०५/२०१८ च्या पत्रान्वये महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत महिलांना विविध व्यवसायांचे प्रशिक्षण देणे व त्याचे लाभार्थी यांची माहिती तसेच नागरवस्ती विकास योजनेअंतर्गत प्रशिक्षण आयटीआय मार्फत देण्यात यावे असे पत्र आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना दिले होते, हे खरे आहे.
- तथापि, सन २०१८-१९ या वर्षाचे प्रशिक्षण अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत देण्यात यावे व पुढील वर्षी हे सर्व प्रशिक्षण आयटीआय मार्फत द्यावे, असे मा.विधानसभा सदस्यांनी महानगरपालिकेस लेखी कळविले आहे.
- तथापि, सन २०२०-२१ मध्ये महिला व बालकल्याण समिती सभा ठराव व स्थायी समिती, पिंपरी चिंचवड महानगरपालिका सभा ठरावान्वये सदरचे प्रशिक्षण कामकाज हे वस्तीपातळी वरील असल्यामुळे आयटीआय ऐवजी अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेद्वारे देण्यास मान्यता देण्यात आली असून, त्यानुसार प्रशिक्षण देण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहरातील प्रभाग क्र. २५ मधील ताथवडे परिसरातील रस्ते कामांबाबत चौकशी करणेबाबत

**(२०) २०३४७ (१८-०१-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी चिंचवड (जि.पुणे) महानगरपालिकेकडून एकाच प्रभाग क्र. २५ मधील ताथवडे परिसरात जीवननगरकडून मुंबई-बेंगलोर कडे जाणारा २४.०० मीटर रुंद डी.पी.रस्ता विकसित करणे व आवश्यकतेनुसार रस्ते कॉक्रीटकरणाची कामे अंदाजपत्रकीय तरतूद कमी असतानाही १०० कोटीपेक्षा अधिक निधींच्या कामांच्या निविदा काढण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापुर्वी प्रभाग क्र. २५ मधील ताथवडे गावठाणापासुन जीवननगर स.न. ९९ ते १०० पुनावळेकडे जाणारा २४ मीटरचा रस्ता विकसित करण्यासाठी एक वर्षापुर्वी ३२ कोटी रुपयांची काम मंजुर करण्यात आली होती तथापि, भुखंड मालकांनी रस्ता विकसित

करण्यासाठी अटकाव केल्याने एक वर्षापासून ठेकेदाराला ताथवडे गावठाणापासुन जीवननगर स.न. ९९ ते १०० पुनावळेकडे जाणारा २४ मीटरचा रस्ता विकसित करण्यासाठी अडचण निर्माण होत असून ठेकेदारास कार्यादेश दिनांक १८/०९/२०१९ रोजी वा त्या सुमारास देवुनही मूळ मालकाने अडवणूक केल्याची अनेक उदाहरणे असताना सदर प्रभागातच परत शेकडो कोटींची कामे करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रभाग क्र. २५ मधील ताथवडे परिसरात जीवननगरकडून मुंबई-बेंगलोर कडे जाणारा २४.०० मीटर रुंद डी पी रस्ता विकसित करणे व आवश्यकतेनुसार रस्ते कॉक्रीटकरणाची कामे चुकीच्या पद्धतीने दिशाभूल करून प्रपत्र 'अ' व प्रपत्र 'ब' द्वारे संपुर्ण रस्त्याची जागा महानगरपालिकेच्या ताब्यात आलेली आहे असे दाखवून महानगरपालिकेमार्फत निविदा काढण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, स्थायी समिती अध्यक्ष यांनी फेरनिविदा काढण्याबाबतचा आदेश दिला असतानाही मा.आयुक्त, पिंपरी.चिंचवड.महानगरपालिका यांनी दिनांक १७/०९/२०२० रोजी वा त्या सुमारास नगरविकास विभागास सादर केलेल्या अहवालात कोणतेही कारण न देता सदर विषय दफ्तरी दाखल करण्यात आल्याची खोटी व दिशाभूल करणारी माहिती शासनाला सादर केली असून मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी नगरविकास विभागास सादर केलेला सदर अहवाल रद्द करणेबाबत पिंपरी चिंचवड, महानगरपालिकेच्या महापौर यांनी मुख्यमंत्री यांच्याकडे दि.२२ सप्टेंबर २०२० रोजी वा त्या सुमारास लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मा.आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रशासना यांनी ठेकेदाराशी आर्थिक संगनमताने ५ कोटींची तरतूद असतानांही १०० कोटी रुपयांची निविदा काढण्याचा दिशाभूल करून प्रस्ताव सादर केला आहे, तसेच दिनांक २७/०८/२०२० रोजीच्या कार्यपत्रिकेतील एका रस्त्याच्या काँक्रिटीकरणाच्या कामाला २२.९० टक्के कमी दराची निविदा आयुक्तांनी स्वीकारली असताना मात्र सदर प्रभाग क्रमांक २५ मधील रस्ते कॉक्रिटीकरण कामासाठी वरील ०७ टक्के पेक्षा जास्त दराची निविदा ठेकेदाराशी आर्थिक संगनमत करुन आयुक्तांनी स्वीकारल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर रस्त्याच्या कामाच्या निविदाची सचिव दर्जाच्या सक्षम अधिकारीमार्फत चौकशी करण्याची मागणी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महापौर यांनी दिनांक २९ /१०/२०२० रोजी वा त्या सुमारास मा. मुख्यमंत्री, मा. नगरविकास मंत्री, व मा. नगरसचिव, मा. उपसचिव यांच्याकडे लेखी पत्राद्वारे केली असून, त्यानूसार चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनूसार दोषी आढळणाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-११-२०२१) :** (१) अंशत : खरे आहे.

- प्रभाग क्र.२५, ताथवडे परिसरात जीवननगर कडून मुंबई-बेंगलोर कडे जाणारा २४.०० मी. डी.पी. रस्ता विकसित करणे व प्रभाग क्र.२५ मध्ये आवश्यकतेनुसार रस्ते काँक्रीटीकरण करणे या २ कामांची निविदा प्रक्रीया सन २०१९-२०२० मध्ये राबविण्यात आली होती.
- सदर कामांची निविदा रक्कम अधिक असली तरी सदर कामे ही नियोजित विकास आराखड्यातील रस्त्यांची असल्यामुळे सदरची कामे पूर्ण होण्यास किमान २-३ वर्षाचा कालावधी लागतो. त्यानुसार त्या-त्या आर्थिक वर्षातील अंदाजपत्रकामध्ये आवश्यकतेनुसार अशा कामांसाठी तरतूद उपलब्ध करून घेण्यात येत असते, असे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) सदर कामाचे कार्यादेश दि.१८/०९/२०१९ रोजी देण्यात आलेले आहेत.

- सद्य:स्थितीत एकूण ८२ टक्के जागा कामासाठी उपलब्ध झालेली आहे.
- कामाचे कार्यादेश दिल्यानंतर पुनवळे हद्दीपासून काम सुरू करण्यासाठी ३५ टक्के जागा ठेकेदाराला अद्यापपर्यंत उपलब्ध करून देण्यात आली असून त्यानुसार प्राथमिक स्वरूपाची कामे तसेच प्रत्यक्ष रस्त्याचे सुमारे ३०० मी. एवढे काम झालेले आहे.
- सदर प्रभाग हा ताथवडे, पुनावळे व वाकड या तीन महसुली गावांचा मिळून झालेला आहे. या प्रभागाचे भौगोलिक क्षेत्र विस्ताराने मोठे असून त्याचा परिसर वाढत्या नागरिकरणामुळे वेगाने विकसित होत आहे. त्यामुळे तेथे मोठया प्रमाणावर विकसनाची कामे चालू आहेत, असे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रभाग क्र.२५ ताथवडे परिसरात जीवननगर कडून मुंबई-बेंगलोर कडे जाणारा २४ मी. रुंद डी.पी. रस्ता विकसित करण्याचे कामासाठी अस्तित्वातील रस्ता व पोहोच रस्ता ४२.०० टक्के, टीडीआर व एफ.एस.आय. २१.८४ टक्के व प्रपत्र अ व प्रपत्र ब द्वारे ६.१६ टक्के अशी एकूण ७० टक्के जागा महानगरपालिकेच्या ताब्यात असून उर्वरित ३० टक्के जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरू आहे.

- प्रभाग क्र.२५ मध्ये आवश्यकतेनुसार रस्ता कॉंक्रीटीकरण करणे या कामाकरिता अस्तित्वातील रस्त्याची एकूण ८९.१६ टक्के जागा महानगरपालिकेच्या ताब्यात असून व उर्वरित १०.८४ टक्के जागा महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरू आहे, असे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कळविले आहे.
- उपरोक्त दोन्ही कामाकरिता बहुतांशी जागा ही अस्तित्वातील रस्त्याची जागा असून त्याचा ताबा निविदा प्रक्रियेपूर्वीच महानगरपालिकेकडे होता.

(४) हे खरे आहे.

- दि.२२.०९.२०२० रोजीचे महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी यांचे पत्र प्राप्त झाले आहे.

(५) निविदा कार्यवाही ही ऑनलाईन पध्दतीने करण्यात येते.

- प्रभाग क्र.२५ मधील आवश्यकतेनुसार रस्ते कॉंक्रीटीकरण करणे या कामाच्या निविदेस चांगला प्रतिसाद मिळाला असून सदर कामासाठी एकूण ७ निविदा प्राप्त झालेल्या होत्या. त्यातील ५ पात्र निविदा धारकापैकी सर्वात कमी म्हणजेच १५.१४ टक्के कमी दराची निविदा अंतिम करण्यात आली होती.
- प्रभाग क्र.२९ मधील सुर्यनगरी व इतर परिसरातील कॉंक्रीटीकरण करणे या कामाकरिता एकूण ६ निविदा प्राप्त झाल्या होत्या त्यापैकी लघुत्तम निविदा दर २२.९९ टक्के असा होता. सदर निविदा अंतिम करण्यात आली.
- या दोन्ही कामांची ठिकाणे वेगवेगळी असल्याने सदर दोन्ही कामांच्या दरामध्ये तफावत दिसून येते. तसेच सदर रस्त्यावरील वाहतूकीचे प्रमाण पाहाता (ट्रॅफिक काऊंट) तसेच जागेवरील येणाऱ्या इतर तांत्रिक अडचणी इत्यादी कारणांमुळे वेगवेगळे ऑनलाईन दर प्राप्त झाले आहेत, असे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कळविले आहे.

(६) दि.०९.११.२०२० च्या शासन निर्णयान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीमध्ये पारित करण्यात आलेले ठराव क्र.७३७६ व ७३७७, दि.२७.०८.२०२० विखंडीत करण्यात आले असून त्यानुषंगाने पुढील उचित कार्यवाही सुरू आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

**पिंपरी न्यायालयाचे नेहरूनगर (पुणे) येथील इमारतीत स्थलांतरण करण्याबाबत**

**(२१) २०३६२ (१८-०१-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड भागातील नागरिकांकरिता सद्य स्थितीत पिंपरी येथे सुरु असलेल्या न्यायालयाची इमारतीमध्ये पुरेशा जागेअभावी कोरोनाच्या कालावधीत काम करताना सोशल डिस्टनसिंग चे पालन करण्यास वकील, पत्रकार, न्यायाधीश यांना अडचणी येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिंपरी न्यायालयाचे नेहरू नगर येथील नवीन जागेत त्वरित स्थलांतर करण्याबाबत व प्राधिकरणातील नियोजित न्यायालयाच्या जागेत अद्यावत न्यायालय उभारण्याच्या कामाला गती देण्याबाबत पिंपरी- चिंचवड ॲडव्होकेट बार असोसिएशनच्या वतीने मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक २९ ऑगस्ट, २०२० रोजी वा त्या सुमारास लेखी स्वरूपात निवेदन देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नेहरूनगर येथील इमारतीमध्ये कोर्ट कामासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने फर्निचरचे काम लवकर सुरु करून सदर इमारतीत पिंपरी न्यायालय स्थलांतर करणेबाबत मा.आयुक्त पिंपरी-चिंचवड, महानगरपालिका यांच्याकडे माहे ऑगस्ट, २०२० मध्ये वा त्या दरम्यान पिंपरी-चिंचवड ॲडव्होकेट बार असोसिएशनच्यावतीने निवेदन देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार प्राधिकरणातील नियोजित न्यायालयाचे काम सुरु करणे तसेच नेहरूनगर येथे तात्पुरत्या स्वरूपात न्यायालय सुरु करणेबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे (२२-११-२०२१) :** (१) हे खरे नाही.

न्यायालयीन परिसरात गर्दी होणार नाही याची दक्षता घेतली जात असून कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना केल्या आहेत व त्या कार्यान्वित आहेत.

(२) हे खरे नाही.

असे निवेदन मा. मुख्यमंत्री कार्यालयात प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(३) हे खरे नाही.

मा. आयुक्त, महानगरपालिका पिंपरी- चिंचवड यांच्याकडे दिलेल्या निवेदनाची प्रत जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे किंवा शासनाकडे प्राप्त झालेली नाही.

(४) याबाबत शासन स्तरावर कार्यवाही चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे वाकड (ता.मुळशी, जि.पुणे येथील सर्वे नं २१० व २११ मधील सार्वजनिक सुविधांकरिता आरक्षित असलेली जमिन हस्तांतरित न करणेबाबत**

**(२२) २०३६५ (१८-०१-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिंचवड मतदार संघातील मौजे वाकड (ता.मुळशी, जि.पुणे) येथील सर्वे नं २१० व २११ मधील आरक्षित १०० एकर जागेपैकी ७५.१७ एकर जागा मूळ मालकाला चार सहकारी

गृहनिर्माण संस्थांकरिता महसूल व वन विभागातर्फे दिनांक ७ जुलै, १९९२ रोजी वा त्या सुमारास जिल्हाधिकारी, पुणे यास 'एलपीओ -१९८९/२३०४/२५७] अ -३, या आदेशान्वये परत करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदेशात उर्वरित २५.३९ एकरातील १५ एकर जागेत पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या नियोजित विकास आराखड्यात बस डेपो, हॉस्पिटल, इत्यादी सार्वजनिक सुविधांकरिता व त्याशिवाय अतिरिक्त १० एकर सार्वजनिक गरजेच्या कामांसाठी नवनगर विकास प्राधिकरणाच्या ताब्यात देण्याच्या अटीवर मूळ मालकाला आरक्षित १०० एकर जागेपैकी ७५.१७ एकर जागा देण्याचे आदेश पारित करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या ताब्यात असलेल्या २५.३९ एकर जमीन बांधकाम व्यावसायिकाने खाजगी विकासाकरिता मिळण्यासाठी मागणी केली असून शहरातील वाढती लोकसंख्या व वाकड परिसरातील वाढते नागरीकरण व भौगोलिक विस्तार पाहता सदर जमीन खाजगी विकासकाला न देता शहराच्या विकासाच्या दृष्टीने सदर जमिनीवर नागरिकांच्या मुलभूत व पायाभूत सुविधा निर्माण करण्याची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर २५.३९ एकर जमीनीवरील सार्वजनिक आरक्षण विकसित करणे आवश्यक असल्याने शहरातील भविष्यातील नागरी सुविधांची गरज लक्षात घेता सदर जमिन बांधकाम व्यावसायिकाला हस्तांतरित करण्यात येऊ नये याबाबत चिंचवड वि.स.स. यांनी दिनांक २७/८/२०२० रोजी वा त्या सुमारास शासनाच्या मा.नगर विकास मंत्री व नगरविकास विभागास यांच्याकडे लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार सदर जमीन खाजगी विकासकाला हस्तांतरित न करणेबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-११-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

- मोजे वाकड, जि.पुणे स.नं.१७७, २०६, २०८ ते २१२ मधील जमिन इशान को.ऑ.हौ.सो. ने भागीदारी तत्वावर विकसित करण्यासाठी मागितली होती.
- याप्रकरणी योग्य असे धोरण तयार करून सादर करण्याबाबत शासनाच्या दि.११.०१.२०१९ च्या पत्रान्वये सूचना देण्यात आल्या होत्या.
- तथापि, दि.०८.०३.२०१९ च्या निर्णयान्वये सर्वांसाठी घरे २०२२ या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण व अन्य दोन प्राधिकरणांच्या जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबत निर्णय झाला होता. तसेच दि.१३.०९.२०१९ च्या अधिसूचनेन्वये नवनगर प्राधिकरणाऐवजी पिंपरी चिंचवड महानगरपालिका नियोजन प्राधिकरण म्हणून कार्यरत झाली होती.

- त्यामुळे याप्रकरणी सद्यस्थितीत वेगळे धोरण करण्याची आवश्यकता राहीलेली नाही, असा निर्णय पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण सभेने घेतला असून असा ठराव क्र.३४१/८ पारित केला होता.
- दिनांक ७ जून २०२१ च्या अधिसूचनेन्वये पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामध्ये विलिन करण्यात आले असून सद्यस्थितीत पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण अस्तित्वात नाही.

(४) होय, हे खरे आहे

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील ड्रीम्स मॉल येथील सनराइज हॉस्पिटलला आग लागून ११ रुग्णांचा झालेला मृत्यु**

**(२३) २७१९९ (१३-०६-२०२१). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), ॲड.राहुल नार्वेकर (कुलाबा), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), श्री.राजकुमार पटेल (मेळघाट), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पूर्व उपनगरातील भांडूप येथील ड्रिम्स मॉलमधील सनराईज रुग्णालयाला लागलेल्या आगीत कोरोनावर उपचार घेणाऱ्या ११ रुग्णांचा मृत्यु झाला असल्याचे दिनांक २५ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेने याप्रकरणी आपत्ती व व्यवस्थापन विभागाच्या उपआयुक्त यांची समिती नेमून सदर समितीने त्याबाबत सर्वकष चौकशी करुन आपला अहवाल १५ दिवसांत महापालिका प्रशासनास सादर करावा असे महानगरपालिका आयुक्तांनी आदेश दिले असल्याचे दिनांक २७ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय

(३) असल्यास, उक्त प्रकरणाच्या चौकशी अहवालांवरुन पालिका आयुक्त यांनी ड्रिम मॉल आणि सनराईज रुग्णांलयाचे व्यवस्थापक, मालकावर गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले असून तसेच तत्कालीन प्रमुख अग्निशमन अधिकारी (प्रभारी) यांचीही खात्यांतर्गत चौकशी करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, इमारतीतील बेकायदा बांधकाम अंतर्गत अग्निसुरक्षा बंद असणे, आग विझवितांना आवश्यक असलेल्या समन्वयाचा अभाव यावर सदर चौकशी अहवालात नमूद केले असून, मॉलच्या दुसऱ्या मजल्यावरील हॉल मध्ये दोन गॅस सिलिंडर ठेवण्याची परवानगी असताना ४५ सिलिंडरचा साठा असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच याप्रकरणी सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला असूनही अद्याप कोणाचीही चौकशी करण्यात आली नसून अटक देखील करण्यात आलेले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषी पालिका अधिकारी, ड्रिम मॉल आणि सनराईज रुग्णांलयाचे व्यवस्थापक, मालकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) तसेच राज्यातील सर्व रुग्णालयांत नर्सिंग होम, मॉल आणि इतर महत्त्वाच्या मोठ्या इमारती यांचे तात्काळ फायर ऑडीट करून घेण्याबाबत शासनाने कोणता कार्यक्रम आखला आहे तसेच राज्यात आगीच्या घटना पुन्हा घडू नयेत या अनुषंगाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-११-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या दिनांक २६.०३.२०२१ रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने उपायुक्त (आपत्कालीन व्यवस्थापन) यांनी प्राथमिक चौकशी पूर्ण करुन दिनांक ०७.०५.२०२१ रोजी प्राथमिक चौकशी अहवाल सादर केला आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) सदर इमारतीमधील अग्निशमन यंत्रणा बंद असल्याचे आढळून आले असून, दुसऱ्या मजल्यावर बॅन्क्वेट हॉलच्या ठिकाणी ४५ सिलेंडरचा अतिरिक्त अवैध साठा केलेला आढळून आल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

सदर प्रकरणी भांडूप पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. २४५/२१, कलम २८५,२८६,३४ भादंवि सह कलम ३,७,८,९ जीवनाश्यक वस्तू अधिनियम १९५५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून, दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

तसेच, गु.र.क्र.९५/२०२१, कलम ३०४, ४६५, ४७१, ४०९, ३४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, दोन आरोपींना अटक करण्यात आल्याचे गृह विभागाने कळविले आहे.

(६) महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालयाच्या दिनांक १२.०४.२०२१ रोजीच्या आदेशान्वये, सर्व महानगरपालिका, नगरपरिषद तसेच विशेष नियोजन प्राधिकरणांच्या सक्षम अधिकारी यांना महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक अधिनियमाच्या व अनुषंगाने नियमाचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश दिले असून, सर्व इमारतीस अनुज्ञाप्ती धारक (Licensen Agency) तसेच निवृत्त अग्निशमन अधिकारी यांचेमार्फत तात्काळ फायर ऑडीट करण्यात यावे असे सांगण्यात आले आहे.

तसेच शासनाचे संचालक/आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांना नोडल अधिकारी म्हणून नियुक्त केले आहे व त्यांनी फायर ऑडीट, इलेक्ट्रिक ऑडीट,

स्ट्रक्चरल ऑडीट व ऑक्सिजन ऑडीट करण्याचे निर्देश सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.

दिनांक २३.०४.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये, रुग्णालयांचे ऑक्सिजन ऑडीट आणि इतर सुरक्षेबाबत तांत्रिक ऑडीट करण्यासाठी संचालक, तांत्रिक शिक्षण संचालनालयाच्या अध्यक्षतेखाली ऑडीट पथक निर्माण करण्यात आले आहे. सदर पथक दर महिन्याला ऑडीट करुन त्यामध्ये असलेल्या त्रुटी संबंधित रुग्णालयांना कळवितात. तसेच संबंधित जिल्हाधिकारी किंवा आरडीसी यांना रुग्णालयांच्या सर्व प्रकारच्या सुरक्षेबाबत अहवाल सादर करतात. त्यानुसार रुग्णालयांची सर्व प्रकारची सुरक्षा अद्ययावत ठेवण्यात येते असे महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालयाने कळविले आहे.

---

## मुंबई महापालिकेच्या अंतर्गत येणाऱ्या शासकीय रुग्णालय, नर्सिंग होम व मॉलमध्ये अग्निशमन यंत्रणेचा अभाव असल्याबाबत

**(२४) २७२०१ (१५-०६-२०२१). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मॉल आणि रुग्णांलयामधील अग्निप्रतिबंधक उपाययोजनांविषयी अग्निशमन दलाने पाहणी केली असता, त्यात मुंबईतील १,३२४ खासगी व शासकीय सरकारी रुग्णालयांपैकी ६६३ रुग्णालयांनी तसेच २९ नर्सिंग होम यांनी अग्निसुरक्षेचे नियम डावलले असल्याचे दिनांक २६ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सर्व रुग्णालये व नर्सिंग होममध्ये अग्निशमनाच्या त्रुटी आढळून आल्याने नोटीस पाठवून, त्या त्रुटींची पूर्तता पुढील तीन महिन्यांच्या आत न केल्यास कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागेल असे स्पष्ट करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महापालिकेकडून नोटीस बजावल्यानंतर ही २१९ खाजगी, ३ सरकारी व २८ महापालिका रुग्णालयांमध्ये अद्याप आवश्यक त्या दुरुस्त्या करण्यात आले नसल्याची बाब सुद्धा निदर्शनास आली आहे, हे सुद्धा खरे आहे काय

(४) तसेच मुंबईतील मानखुर्द व गोवंडी परिसरातील ४९ पैकी ३९ खाजगी नर्सिंग होम यांनी अग्निशमन दल व पालिकेच्या इमारत व कारखाना विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र न घेताच चालवले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त सर्व प्रकरणी ज्या रुग्णालये व नर्सिंग होम यांना नोटीस पाठवून देखील, महाराष्ट्र अग्नीप्रबंधक आणि जीवन सुरक्षा कायदा २००६ नुसार अग्निप्रतिबंधक उपाययोजना केलेली नाही तसेच मानखुर्द व गोवंडी परिसरातील खासगी नर्सिस होम यांनी ना-हरकत प्रमाणपत्र घेतलेले नाही अशा रुग्णालयांवर शासनाने कारवाई करण्याबाबत तसेच रुग्णालय, नर्सिंग होम व मॉलमध्ये अग्निप्रतिबंधक यंत्रणा सक्षम करण्यासाठी तातडीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-११-२०२१) :** (१), (२) व (३) ड्रीम मॉल, सनराईज हॉस्पिटल येथील दिनांक २५.०३.२०२१ रोजीच्या आगीच्या दुर्घटनेनंतर बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील एकूण १५७४ खाजगी/शासकीय/निमशासकीय, रुग्णालये, प्रसुतीगृहे, नर्सिंग होम यांची अग्निसुरक्षा विषयक तपासणी करण्यात आली व अग्निसुरक्षाविषयक शर्ती व अटींच्या त्रुटी आढळून आल्याने त्यांना नोटीस पाठवून विहित मुदतीत आवश्यक ती पूर्तता करण्याचे निर्देशित करण्यात आले होते.

त्यापैकी एकूण १०६९ आस्थापनांनी विहित मुदतीत अग्निसुरक्षाविषयक अटी व शर्तींचे पालन केलेले आढळून आले, ९० आस्थापनांना अग्निसुरक्षा विषयक अटी व शर्तींमध्ये त्रुटी आढळून आल्याने त्यांना महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ अंतर्गत नोटीस बजावण्यात आलेल्या असून, विहीत मुदतीत त्रुटींची पुर्तता न केल्यास महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ अंतर्गत पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) मानखुर्द व गोवंडी परिसरात एकूण ७९ रुग्णालये आहेत. त्यापैकी ३८ रुग्णालयांची नोंदणी झालेली नसून, नोंदणीकृत ४१ रुग्णालयांपैकी ५ रुग्णालये सद्य:स्थितीत बंद आहेत व २ रुग्णालयांनी अग्निप्रतिबंधक उपाययोजना पूर्तता प्रमाणपत्र प्राप्त केले आहे.

नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट १९४९ अंतर्गत नोंदणीकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या इमारत व कारखाना विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ अंतर्गत अग्निसुरक्षा विषयक त्रुटींची पूर्तता विहित मुदतीत करण्याची नोटीस बजावण्यात आल्यानंतर, विहित मुदतीत त्रुटींची पूर्तता न करणाऱ्या रुग्णालये, नर्सिंग होम, मॉल या आस्थापनांवर महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ मधील तरतुदीअंतर्गत पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

तसेच, मानखुर्द व गोवंडी परिसरातील खाजगी नर्सिंग होम या आस्थापनांकडे नर्सिंग होमच्या आरोग्य अधिकाऱ्यांची "सी" प्रमाणपत्र नसल्याचे आढळून आल्याने योग्य कार्यवाही करण्यासाठी आरोग्य अधिकारी यांना सूचित करण्यात आले आहे.

तीन महिन्यांच्या नोटीस कालावधीनंतर अग्निप्रतिबंधक उपाययोजना प्रमाणपत्र सादर न करणाऱ्या नर्सिंग होम/रुग्णालये यांना सुनावणीकरिता बोलावण्यात येणार आहे. सुनावणीमध्ये तथ्य आढळून न आल्यास, नजीकच्या पोलीस ठाण्यात एफ.आय.आर. दाखल करुन सदर नर्सिंग होम/रुग्णालयांची नोंदणी रद्द करण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बीड जिल्हातील कोरोना रुग्णांच्या मृत्यूच्या नोंदी करण्यात होत असलेला निष्काळजीपणा**

**(२५) २७२७४ (१५-०६-२०२१). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोनामुळे मृत्यू झालेल्या रुग्णांची आकडेवारी लपवली जात असल्याची बाब वारंवार निदर्शनास येत असतानाच बीड जिल्हा आरोग्य विभाग व प्रशासनाने कोरोना उपचारावरील हलगर्जीपणा आणि उपाययोजनेतील अपयश निदर्शनास येऊ नये यासाठी कोरोना रुग्णांची मृत्यू संख्या लपवून ठेवण्याचा प्रकार माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीड जिल्ह्यात माहे एप्रिल व मे महिन्यातील २०४ मृत रुग्णांची आयसीएमआर पोर्टलवर नोंदच करण्यात आली नसल्याची बाब निदर्शनास आली असून मृतांची नोंद आणि स्मशानातील नोंद यात तफावत असल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, सदर चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार या गैरप्रकरातील दोषी असण्या-या संबधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. राजेश टोपे (१६-११-२०२१) :** (१) हे खरे नाही,

(२) हे अंशत: खरे आहे.

अचानक झालेली रुग्ण वाढ आणि डेटा व्यवस्थापनांकरिता असणारे अपुरे मनुष्यबळ यामुळे मृत्यूच्या नोंदी अद्यावत करण्यास विलंब झाला, तथापि या सर्व नोंदी पुर्ण करण्यास आल्या आहेत.

(३) होय

१. या प्रलंबित मृत्यु नोंदी बाबत सविस्तर चौकशी करण्यात आली असून त्यामधील पुढील निष्कर्ष काढण्यात आलेले आहेत.

२. १.बीड जिल्ह्यात दि.२२ जुन, २०२१ पर्यंत आय.सी.एम.आर.पोर्टलवर एकुण २४५८ मृत्युच्या नोंदी करण्यात आल्या असुन १२६१ नोंदी ह्या मृत्यु झाल्यानंतर ४८ तासानंतर करण्यात आलेल्या आहेत.

३. २.बीड जिल्ह्यात झालेल्या वरील कोविड-१९ च्या मृत्युचे डेथ ऑडिट करण्यात आलेले असुन अचानक कोविड-१९ च्या रुग्णात झालेली वाढ व अपुरे मनुष्यबळ यामुळे राहिलेल्या नोंदी पुरेसे मनुष्यबळ देवून कोविड-१९ पोर्टलवर पुर्ण करण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

**कुस्तीगीरांना खुराकाचा खर्च भागविण्यासाठी मिळणारे अनुदान**
**क्रीडा व युवक सेवा संचालनालयाने बंद केल्याबाबत**

**(२६) २७२७९ (०९-०६-२०२१). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या कार्यालयाकडून कुस्तीगीरांना खुराकाचा खर्च भागविण्यासाठी मिळणारे अनुदान बंद केले असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील राज्य निवड चाचणी स्पर्धेत खेळण्यासाठी पात्र ठरलेल्या कुमार गटातील कुस्तीपटूंना वार्षिक ७ हजार २००, तर प्रौढ गटातील कुस्तीपटूंना वार्षिक १२ हजार असे खुराकासाठी अनुदान दिले जात होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू अनुदान फक्त कुस्ती क्रीडा प्रकारात दिले जात असून त्याचा लाभ राज्यातील १६०० कुस्तीपटूंना मिळत होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबतची चौकशी शासनाने केली आहे काय, त्यानुसार कुस्तीगीरांना खुराकाचा खर्च भागविण्यासाठी मिळणारे अनुदान पुन्हा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार (२३-११-२०२१) :** (१) कुस्तीगिरांना मानधनाच्या योजनेमध्ये शासन निर्णय , दि.०७.०५.२०२१ अन्वये सुधारणा केली आहे. त्यानुसार कुस्ती स्पर्धांच्या वजनी गटात व मानधनाच्या दरात वाढ केली आहे. तसेच ५ व्या व ६ व्या क्रमांकावरील आणि सहभागी कुस्तीगिरांना वगळले आहे.

(२), (३) व (४) एकूण ७ वजन गटातील कुस्तीगिरांव्यतिरीक्त सहभागी खेळाडूंना शासन निर्णय दि.२१.१२.२०१२ नुसार वार्षिक रु.७२००/- इतके मानधन देण्यात येत होते.

(५) प्रश्न उद्भवत नाही

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) शहरातील कॅम्प १ भागातील मोहिनी पॅलेस**
**या अनधिकृत इमारतीचा स्लॅब कोसळल्याबाबत**

**(२७) २७२८२ (१२-०६-२०२१). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर शहरातील (जि.ठाणे) कॅम्प १ भागातील मोहिनी पॅलेस या अनधिकृत इमारतीचा स्लॅब दिनांक १५ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास कोसळून ५ व्यक्ती मृत व ६ व्यक्ती जखमी झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच उल्हासनगर शहरातील नेहरू चौक भागातील साईशक्ती ही पाच मजली इमारत कोसळून त्यात ७ व्यक्तींचा मृत्यु झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने संबधितांविरुद्ध कारवाई करण्याबाबत तसेच मृतांच्या नातेवाईकांना व जखमींना आर्थिक मदत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-११-२०२१) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) सदर दोन्ही घटनांची चौकशी करणेकामी अतिरिक्त आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन करण्यात आली आहे.
(४) सदर चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालाआधारे मोहिनी पॅलेस व साईशक्ती अपार्टमेंट या इमारतीच्या विकासकांविरुध्द अनुक्रमे दिनांक १२.०६.२०२१ व दिनांक १८.०६.२०२१ रोजी पोलीस स्टेशनला रितसर गुन्हा दाखल करण्यात आला आहे असे उल्हासनगर महानगरपालिकेने कळविले आहे.

सदरहू घटना ही मानव निर्मित आपत्तीमधील निवासी इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेतील अटी/शर्तींची पूर्तता करीत नसल्याने मदतीकरिता पात्र ठरत नाही असे मदत व पुनर्वसन विभागाने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात म्युकरमायकोसिस आजाराचा प्रसार रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

**(२८) २७३१९ (१६-०६-२०२१). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (निलंगा), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.राजेश पवार (नायगांव), ॲड.राहुल नार्वेकर (कुलाबा), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) राज्यात कोराना या संसर्गजन्य आजारानंतर कोरोना मुक्त झालेल्या रुग्णामध्ये साखरेची अनियंत्रित पातळी आणि स्टिरॉईडसह अन्य औषधामुळे कमी झालेल्या रोग

प्रतिकारकशक्तीमुळे म्युकरमायकोसिस या बुरशीजन्य आजाराच्या रुग्णसंख्येत झपाटयाने वाढ होत असून राज्यात किमान दोन हजार रुग्णांना या आजाराची लागण झाली असल्याचे तसेच ८०० पेक्षा जास्त रुग्ण उपचार घेत असून ९० रुग्णांचा मृत्यू झाला असल्याचे तसेच अनेक रुग्णांची दृष्टी गेल्याचे माहे मे,२०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले,हे खरे आहे काय,

(२) असल्यास,या आजाराचे कल्याण-डोंबिवलीसह बीड,ठाणे , कोल्हापूरध्ये एकूण ८ रुग्णांचा मृत्यू तसेच मुंबईत १११ ,कल्याण-डोंबिवली येथे ६ तर कोल्हापूरमध्ये ७ रुग्ण या आजाराचे संशयित रुग्ण उपचार घेत असल्याचे तसेच सोलापूर जिल्हयात या आजारावरऔषध उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे ,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या आजाराच्या उपचारासाठी वापरण्यात येणारे इंजेक्शनची किंमत जास्त असल्याने खाजगी रुग्णालयात दाखल केलेल्या रुग्णांचा इंजेक्शनचा खर्च शासन करणार आहे काय तसेच खाजगी रुग्णालयात उपचाराचे दर शासन ठरवून देणार आहे काय,

(४) असल्यास, या आजाराचा उपचाराचा खर्च जास्त असल्याने यावर शासन मोफत उपचार किवा महात्मा फुले जनआरोग्य योजनेमध्ये समावेश करण्यात यावा अशी मागणी लोकप्रतिनीधी व रुग्णाच्या नातेवाईकांकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, महात्मा फुले आरोग्य योजनेअंतर्गत कोरोना व म्युकरमायकोसिस या आजाराच्या किती रुग्णावर उपचार करण्यात आले आहेत तसेच याकरीता किती निधीची तरतूद करण्यात आली आहे व तरतूद केलेल्या निधीपैकी किती निधी खर्च करण्यात आला व किती रुग्णांना याचा लाभ मिळाला आहे,

(६) असल्यास, म्युकरमायकोसिस या आजाराचा प्रसार व मृत्यू संख्येतील वाढ रोखण्यासाठी प्रतिबंधनात्मक उपाय तसेच या आजारावरील परिणामकारक असलेली औषध उपलब्ध करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (१६-११-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात कोरोना या संसर्गजन्य आजारानंतर कोरोनामुक्त झालेल्या रुग्णामध्ये साखरेची अनियंत्रित पातळी आणि स्टिरॉईडसह अन्य औषधामुळे कमी झालेल्या रोग प्रतिकारकशक्तीमुळे म्युकरमायकोसिस या बुरशीजन्य आजाराच्या रुग्णसंख्येत प्रामुख्याने वाढ दिसून आलेली आहे. माहे जून २०२१ अखेर राज्यामध्ये ८७३३ रुग्णांची नोंद झाली आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे

कोल्हापूर मध्ये एकूण ८ रुग्णांचा मृत्यु तसेच मुंबईत १११ कल्याण-डोंबिवली येथे ६ तर कोल्हापूरमध्ये ७ रुग्ण या आजाराचे संशयीत रुग्ण उपचार घेत असल्याचे खरे आहे.

सोलापूर जिल्ह्यामध्ये या आजारावरील औषधे उपलब्ध आहेत.

(३) होय, या आजाराच्या उपचारासाठी वापरण्यात येणारे Inj. Ampho B५० mg ची खरेदी केलेली आहे. राज्यातील आरोग्य संस्थांना राज्यस्तरावरुन पुरवठा करण्यात आला असून शासकिय व खासगी आरोग्य संस्थांमध्ये दाखल म्युकरमायकोसिस रुग्णांना सदरचे इंजेक्शन उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. तथापि महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजने

अंतर्गत समाविष्ट असणा-या रुग्णालयामध्ये दाखल रुग्णांना पुर्णत: मोफत उपचार दिले जात आहेत. तसेच खाजगी रुग्णालयात उपचाराचे दर शासनाने दिनांक ०३.०६.२०२१ च्या अधिसुचनेन्वये ठरवून दिलेले आहेत.

(४) शासन निर्णय क्र.मफुयो-२०२१/प्र.क्र.१०३/ आरोग्य-६ दिनांक १८ मे २०२१ नुसार म्युकरमायकोसिस हा आजार महात्मा फुले जन आरोग्य योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आलेला आहे व त्यानुसार रुग्णांना पुर्णत: मोफत उपचार दिले जात आहेत.

(५) दिनांक १ एप्रिल, २०२० ते दिनांक १७ जून २०२१ या कालावधीमध्ये ९,६५,३३१ कोवीड रुग्णांवर योजनेतील अंगीकृत रुग्णालयांमध्ये मोफत उपचार व शस्त्रक्रिया झाल्या असून त्यापैकी १,४९,१७३ प्रकरणांची माहिती संगणक प्रणालीवर अद्ययावत करण्यात आली आहे. कोवीड रुग्णांवर योजनेतंर्गत रु. ३२१.८५ कोटी इतक्या रक्कमेचे उपचार/ शस्त्रक्रिया झाल्या आहेत. दिनांक १८ मे २०२१ ते १६ जून २०२१ या कालावधीमध्ये २२५७ म्युकरमायकोसीस रुग्णांवर महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेमध्ये मोफत उपचार झाले असून या कालावधीमध्ये रु.९.१२ कोटी इतक्या रक्कमेचे उपचार / शस्त्रक्रिया म्युकरमायकोसिस रुग्णांवर महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेतंर्गत झाले आहेत.

म्युकरमायकोसीस या आजारावरील उपचाराकरिता येणारा खर्च महात्मा ज्योतिरावर फुले जन आरोग्य योजनेच्या लेखाशिर्षातून भागवावा असे दिनांक १८ मे, २०२१ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

(६) म्युकरमायकोसिस प्रतिबंध व नियंत्रणासाठी पुढील उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत:-

१. राज्यातील सर्व जिल्हा/महानगरपालिकांना म्युकरमायकोसिस चे रुग्ण हाताळण्या संबंधित मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत.

२. शासन निर्णय क्र. मफुयो-२०२१/प्र.क्र.१०३/आरोग्य -६ दिनांक १८ मे २०२१ नुसार म्युकरमायकोसिस आजारावर महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत मोफत उपचार करण्यास मान्यता प्रदान केली आहे.

३. राज्यामध्ये म्युकरमायकोसिस उपचार देणारी एकूण ५९२ रुग्णालये असून, त्यापैकी १३१ रुग्णालयांमध्ये महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत रुग्णांना पुर्णत: मोफत उपचार केले जात आहेत. तसेच ४२ शासकीय रुग्णालये व ४१९ खाजगी रुगणालयांतर्गत रुग्ण उपचार घेत आहे.

४. आयुक्तालयाकडील दि.१७.५.२०२१, दि.१९.५.२०२१ व दि.२.६.२०२१ रोजीच्या परिपत्रकानुसार सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत शासकीय रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, तसेच महापालिका रुग्णालयामध्ये उपचारार्थ दाखल असणा-या रुगणांना मोफत औषधे उपलब्ध करुन देणेबाबत कळविले आहेत.

५. म्युकरमायकोसिस आजारावील उपचारासाठी वापरण्यात येणारे Inj-Amphoterecin B ५०mg या औषधाची केंद्रशासनाकडून राज्यनिहाय उत्पादकनिहाय संख्या निश्चित करुन देण्यात येत आहे. राज्यस्तरावरुन त्यानुसार उपलब्ध होणा-या साठ्याची खरेदी करुन राज्यातील आरोग्य संस्थांच्या मागणी व उपलब्धतेनुसार पुरवठा केला जात आहे. राज्यातील

प्रत्येक जिल्ह्यातील रुग्णसंख्येनुसार वाटप करण्यात आले आहे. सदर वाटप विभागीय आरोग्य उपसंचालक स्तरावर केले आहे. तेथून प्रत्येक विभागातील जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी व जिल्हाशल्यचिकित्सक यांनी रुग्णसंख्येनुसार केले आहे.

६. सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत आरोग्यसेवा आयुक्तालय, मुंबई यांच्या स्तरावरुन केंद्रशसनाने निर्धारीत केलेल्या पुरवठादारांकडून Inj-Amphoterecin B ५० mg ची खरेदी केली, तसेच राज्यातील आरोग्य संस्थांची निकड लक्षात घेऊन अभिव्यक्ती स्वारस्य पध्दतीने दर मागवून खरेदी केली आहे. Inj-Amphoterecin B ५० mg च्या एकूण ५४८८९० एवढ्या व्हायल्स ची आजअखेर खरेदीप्रक्रिया राबविण्यात आली आहे.

७. राज्यातील आरोग्य संस्थांना राज्यस्तरावरुन पुरवठा करण्यात आला असून शासन निर्देशानुसार शासकीय व खाजगी आरोग्य संस्थांमध्ये दाखल म्युकरमायकोसिस रुग्णांना सदरचे इंजेक्शन उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

८. राज्याने केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या दि.२० मे, २०२१ रोजीच्या सूचनांन्वये म्युकरमायकोसिस या आजाराला "साथरोग कायदा-१८९७" अंतर्गत दि.२५ मे २०२१ रोजी अधिसूचित केलेल आहे.

---

**मुंबईत पावसाळ्यात पाणी तुंबण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी उपाययोजना करणेबाबत.**

**(२९) २७४३९ (१८-०६-२०२१). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत पावसाळ्यात पाणी साचू नये याकरीता मुंबई महानगरपालिकेने ४०५ पैकी २९६ ठिकाणी आवश्यक उपाययोजना केल्या असून देखील उर्वरित १०९ ठिकाणी यावर्षी पाणी साचण्याची शक्यता असल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ४०५ ठिकाणांपैकी केवळ १७१ ठिकाणांची कामे पूर्ण झाली असून उर्वरित ठिकाणांची कामे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, असल्यास, मुंबईत पावसाळ्यात साचलेल्या पाण्याचा निचरा करण्यासाठी लाखो रुपये खर्च करून मोठ्या प्रमाणात उदंचन केंद्रे उभारण्यात आली असतानाही दरवर्षी एवढ्या मोठ्या प्रमाणात पाणी साचण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने मुंबईत पाणी साचण्याचे प्रमाण रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-११-२०२१) :** (१), (२), (३) व (४) मुंबईची भौगोलिक रचना पाहता सर्वसाधारणपणे उच्च भरतीच्या वेळी अतिवृष्टी झाल्यास काही सखल भागात पाणी साचण्याच्या घटना घडतात.

मुंबई शहर व उपनगरात एकूण ३८६ ठिकाणे पूरप्रवण ठिकाणे म्हणून निश्चित करण्यात आली आहेत, त्यापैकी १७१ पूरप्रवण ठिकाणे आजपर्यंत हाताळण्यात आली आहेत. उर्वरित २१५

पूरप्रवण ठिकाणांपैकी १२५ पूरप्रवण ठिकाणे २०२१ च्या पावसाळ्यापूर्वी, २५ पूरप्रवण ठिकाणे २०२२ च्या पावसाळ्यापूर्वी व ८ पूरप्रवण ठिकाणे २०२२ च्या पावसाळ्यानंतर हाताळण्याचे नियोजन बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात आले आहे. तसेच, १४ पूरप्रवण ठिकाणांची कामे नियोजन स्तरावर असून, ४३ पूरप्रवण ठिकाणांची कामे इतर शासकीय प्राधिकरणाशी/ खाजगी आस्थापनांशी संबंधित असून याबाबत शासकीय प्राधिकरणांशी समन्वय साधण्यात आला आहे.

सन २०२१ च्या पावसाळ्यापूर्वी हाताळण्यात येणाऱ्या १२५ पूरप्रवण ठिकाणांपैकी ९८ पूरप्रवण ठिकाणी कामे पूर्ण झाली असून, २७ पूरप्रवण ठिकाणी कामे प्रगतीपथावर आहेत असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदुरा (जि.बुलढाणा) तालुक्यामध्ये "माझे कुटुंब माझी जबाबदारी "अभियानांतर्गत आरोग्य तपासणी करत असताना दुर्धर आजाराचे रुग्ण आढळल्याबाबत**

**(३०) २७४९६ (१५-०६-२०२१). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदुरा (जि.बुलढाणा) तालुक्यामध्ये "माझे कुटुंब माझी जबाबदारी" या अभियानांतर्गत आरोग्य तपासणी करत असताना दुर्धर आजाराचे ९७२ रुग्ण आढळल्याची बाब दिनांक १५ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त रुग्णांमध्ये डेंगू, उच्च रक्तदाब, मधुमेह व कॅन्सर या गंभीर आजारांचे रुग्ण निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय निष्पन्न झाले,

(४) असल्यास, सदरहू दुर्धर आजार असलेल्या रुग्णांची नियमित तपासणी करून त्यांच्यावर योग्य औषधोपचार करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२९-०९-२०२१) :** (१) होय हे खरे आहे.

(२) हे खरे आहे,

(३) दिनांक १५.०९.२०२० ते दिनांक २५.१०.२०२० या कालावधीमध्ये नांदुरा तालुक्यात माझे कुटुंब माझी जबाबदारी मोहिमेमध्ये उच्च रक्तदाब ह्दयरोगाचे १५४२, मधुमेह १०४२, कॅन्सर ४१ व इतर आजाराचे ४४२ असे एकूण ३०६७ रुग्ण आढळून आलेले आहेत.

(४) होय, प्राप्त अहवालानुसार,

माझे कुटुंब माझी जबाबदारी मोहिमेच्या मार्गदर्शक सूचनांना अनुसरून सदरहू दुर्धर आजारी रुग्णांची वैद्यकीय अधिकारी यांचेमार्फत तपासणी करून त्यांना आवश्यकतेनुसार तज्ञांमार्फत उपचार, संदर्भसेवा, आरोग्य शिक्षण इ. सेवा सुविधा पुरवण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खेड (जि.रत्नागिरी) येथील प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना निधी मिळणेबाबत**

**(३१) २७९५२ (१२-०६-२०२१). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.रत्नागिरी) नगरपरिषदेतील प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मंजूर लाभार्थ्यांना निधी मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.२४ सप्टेंबर, २०२० रोजीच्या सुमारास मा. गृहनिर्माण मंत्री यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार निधी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (१६-११-२०२१) :** (१) होय.

खेड नगरपरिषदेने स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे दि.२४ सप्टेंबर, २०२० रोजीचे लेखी निवेदन मा. मंत्री (गृहनिर्माण) महोदयांना दिलेले आहे.

(२) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत खेड (जि. रत्नागिरी) नगरपरिषद क्षेत्रात केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समिती (CSMC) मान्यता प्राप्त १३ घरकुलांना राज्य हिश्श्यापोटी रु.१ लक्ष प्रति घरकुल प्रमाणे रु.१३ लक्ष व केंद्र हिश्श्यापोटी पहिला हप्ता रु. ६०,०००/- प्रति घरकुल प्रमाणे रु.७.८ लक्ष असा एकूण रु.२०.८० लक्ष इतका निधी खेड नगरपरिषदेस वितरीत करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबइ्र मंडळाच्या लॉटरीतील कोरोना महामारीच्या काळात क्वारंटाईनच्या वापरासाठी घेतलेल्या सदनिकांची झालेली दूरवस्था**

**(३२) २८१८९ (१२-०६-२०२१). श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुंबई मंडळाच्या लॉटरीतील २२४४ रिकामी घरे मुंबई पालिकेने गेल्यावर्षी कोरोनाच्या काळात क्वारंटाईनच्या वापरासाठी घेतले असल्याची बाब माहे मार्च २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, म्हाडाने क्वारंटाईनसाठी दिलेल्या घरांची दुरवस्था झाल्याने ताब्यात घेताना सुस्थितीत करून देण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या घरांचे ठरलेले भाडेही पालिकेकडून म्हाडाला अद्याप देण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर घरांची दुरुस्ती व ठरलेले भाडे देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे?

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-११-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) सदर प्रकरणी म्हाडाकडून कोणतेही भाडे ठरविण्यात आले नव्हते असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पशुसंवर्धन विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना विमा संरक्षण कवच, सानुग्रह अनुदान मंजूर करुन लसीकरण प्राधान्याने देवुन त्यांना फ्रंटलाईन कर्मचारी म्हणून घोषित करणेबाबत**

**(३३) २८२७७ (१०-०६-२०२१). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.राहूल कुल (दौंड), श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पशुवैद्यकीय अधिका-यांची सेवा कोरोनाकाळात अत्यावश्यक सेवेत समाविष्ट करण्यात येऊनही त्यांना विमाकवच दिले गेले नसून कोरोनाच्या कालावधीत एकूण ७०० पशुवैद्यक अधिका-यांना कोरोनाची लागण झाली असून ३० जणांचा मृत्यू झाला असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पशुसंवर्धन विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना विमा संरक्षण कवच, सानुग्रह अनुदान मंजूर करून लसीकरण प्राधान्याने देवुन त्यांना फ्रंटलाईन कर्मचारी म्हणून घोषित करण्याची मागणी पशुसंवर्धन विभाग संघटनांकडून केलेली असुन याबाबत लोकप्रतीनिधिंनी देखील मा. मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री व पशुसंवर्धन मंत्री यांना निवेदने दिलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पशुसंवर्धन विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना विमा संरक्षण कवच, सानुग्रह अनुदान मंजूर करुन लसीकरण प्राधान्याने देवुन त्यांना फ्रंटलाईन कर्मचारी म्हणून घोषित करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार (२७-१०-२०२१) :** (१)पशुसंवर्धन विभागातील जिल्हा परिषद स्तरावरील ६ अधिकारी व ३१ कर्मचारी, तसेच राज्यस्तरीय कार्यालयातील ३ अधिकारी व १८ कर्मचारी असे एकूण ५८ अधिकारी/कर्मचारी कोव्हीड-१९ या आजाराने मृत पावल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) अशा स्वरूपाची मागणी करण्यात आलेली आहे.

(३) कोव्हीड-१९ च्या पार्श्वभूमीवर अत्यावश्यक काम करणाऱ्या पशुसंवर्धन विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्राधान्याने लसीकरण करण्याबाबत आयुक्त पशुसंवर्धन यांच्याकडून सर्व जिल्हाधिकारी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद तसेच प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

दिनांक २९.५.२०२०रोजीच्या शासन निर्णयानुसार सदर योजना ही विशिष्ट विभाग वा त्यातील कार्यरत विशिष्ट संवर्गांना अथवा अत्यावश्यक सेवांना लागू करण्यात आलेली नसून, कोरोना सार्वत्रिक साथीच्या अनुषंगाने सर्वेक्षण, शोध, माग काढणे, प्रतिबंध, चाचणी, उपचार व मदत कार्य या कर्तव्यांवर असतांना संबंधित कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्यास लागू आहे. त्यामुळे सरसकटपणे पशुसंवर्धन विभागातील अधिकारी/कर्मचारी यांना विमा संरक्षण कवच, सानुग्रह अनुदान योजना लागू करता येणार नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरात आगीच्या घटनेत वाढ झाल्याबाबत**

**(३४) २८४०१ (१८-०६-२०२१). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात माहे जानेवारी, २०२१ पासून आगीच्या ५४६ घटना घडल्यामुळे अग्निशमन दलावर प्रचंड ताण येत असल्याची बाब दिनांक ९ एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, फॅशन स्ट्रीट, सीरम इन्स्टिट्यूट, सेंट्रल मॉल, बिबवेवाडीतील सजावट साहित्य, कॅम्पातील शिवाजी मार्केट, येरवडा येथील शाळेतील रेकॉर्ड रूम या ठिकाणी लागलेल्या आगीत मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-११-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) • दि.०३.०३.२०२१ रोजी दु.२.५२ वाजता पोकळेवस्ती, बीबवेवाडी,पुणे येथे मोकळ्या जागेत मंडप साहित्याला आग लागली होती.
• सदर आग टँकरच्या सहाय्याने सायंकाळ पर्यंत पूर्ण विझवण्यात आली.
• आगीमध्ये गोडाऊन मधील मंडप सजावटीचे साहित्य, रस्त्याच्या कडेला उभी असलेली वाहने तसेच लगतच्या इमारतीमधील घरातील वस्तुंना आग लागल्याचे निदर्शनास आले.
• दि.२४.०३.२०२१ रोजी नेताजी सुभाष चंद्र बोस माध्यमिक विद्यालय, येरवडा, पुणे येथे शाळेच्या इमारतीतील ३ मजल्यावरील खोलीमधील जुने रेकॉर्ड पेपर्सना आग लागली होती. सदर आग तातडीने विझवण्यात आली.
• तसेच दि.२९.०३.२०२१ रोजी सेंटर मॉल, एरंडवणे, पुणे येथे मॉलच्या इमारतीमधील बेसमेंट मध्ये रासायनिक पावडर जळून त्यातून मोठ्या प्रमाणात उग्र वासाचा धूर निर्माण झाला होता.
• अग्निशमन दलाच्या ३ वाहनांच्या सहाय्याने आग पूर्णत: विझवण्यात आली.
• तसेच फॅशन स्ट्रीट व शिवाजी मार्केट हे पुणे कॅन्टोन्मेंट बोर्ड परिक्षेत्रात असून सदर आग पुणे महानगरपालिका व कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या अग्नीशमन यंत्रणांनी तातडीने विझवली आहे.

• सिरम इन्स्टीट्यूट, मांजरी हे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्या परिक्षेत्रात आहे. या ठिकाणी लागलेली आग पुणे महानगरपालिका, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या अग्नीशमन यंत्रणांनी तातडीने विझवली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सिरोंचा (जि.गडचिरोली) येथील ग्रामिण रुग्णालयात स्त्रिरोग तज्ञ व इतर आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध करणे तसेच जव्हार (जिल्हा पालघर) येथील कुटीर रुग्णालयात भूलतज्ञांची नेमणूक करण्याबाबत**

**(३५) २८८८७ (१३-०७-२०२१). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिरोंचा (जि.गडचिरोली) येथील ग्रामिण रुग्णालयात स्त्रिरोग तज्ञ व पुरेशा आरोग्य सुविधा उपलब्ध नसल्याने येथील गभर्वती महीला प्रसुतीकरीता तेलंगाणा राज्यातील महादेवपुर येथील शासकीय रुग्णालयात जात असल्याची बाब माहे मे २०२१ च्या दुसऱ्या आठवडयात वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच जव्हार (जिल्हा पालघर) येथील कुटीर रुग्णालयात भूलतज्ञांची नेमणूक केली नसल्याने गर्भवती महिलांना प्रसूतीसाठी नाशिक किंवा वाडा येथील रुग्णालयात जावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कुटीर रुग्णालयात रिक्त असलेल्या भूलतज्ञ यांची तात्काळ नेमणूक करावी अशी मागणी जव्हार मधील सामाजिक कार्यकर्त्या महिलांनी सदर रुग्णालयाचे अधीक्षक डॉक्टर रामदास मराठ यांना एका दिनांक २७ मे २०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे तसेच येथील नागरीकांनी मागील एक वर्षापासून सातत्याने मा. मुख्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य मंत्री व पालकमंत्री, पालघर जिल्हा आदींकडे लेखी निवेदने सादर करून मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ग्रामीण रुग्णालय, सिरोंचा येथे स्त्रिरोग तज्ञ व इतर आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध करणे तसेच जव्हार येथील कुटीर रुग्णालयात भूलतज्ञांची कायम स्वरुपी नेमणूक करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२६-११-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) कुटीर रुग्णालय जव्हार येथील भुलतज्ञ यांची पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी निवड झाल्याने सदर पद रिक्त झाले आहे. तथापि, उपजिल्हा रुग्णालय कासा येथील भुलतज्ञ डॉ. तरसे यांच्या सेवा आठवड्यातील दोन दिवस कुटीर रुग्णालय, जव्हार येथे उलपब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

(३) हे खरे आहे.
वैद्यकीय अधिक्षक कुटीर रुग्णालय, जव्हार यांना युवतीसेना जव्हार शहर व तालुका यांचे निवेदन प्राप्त झालेले आहे.
(४) ग्रामीण रुग्णालय, सिरोंचा येथे आयपीएचएस अंतर्गत नियुक्त स्त्रीरोगतज्ञ प्रतिनियुक्तीने दि. ०६.०२.२०२१ पासून कार्यरत आहेत.
तसेच डॉ. प्रसाद तरसे (भुलतज्ञ), वैद्यकीय अधिकारी गट-अ यांची कुटीर रुग्णालय, जव्हार येथे बदलीने पदस्थापना देण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर (ता, जि.सोलापूर) शहरात विविध कंपन्यानी अनधिकृत मोबाईल टॉवर उभारल्याबाबत...**

**(३६) ३००७० (१३-०६-२०२१). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर (ता., जि.सोलापूर) शहरात विविध कंपन्यांनी अनधिकृतपणे मोबाईल टॉवर उभारले असल्याचे माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अनधिकृत टॉवर कंपनीने महानगरपालिकेचा कोट्यावधी रुपयांचा महसूल बुडविला आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, महानगरपालिकेने मोबाईल कंपन्यांना नोटीस बजावूनही महानगरपालिकेच्या आदेशाकडे कंपन्या दुर्लक्ष करत असल्याचेही निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रस्तुत प्रकरणी चौकशी केली आहे काय, तद्नुसार चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने अनधिकृत मोबाईल टॉवर बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-११-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) सोलापूर महानगरपालिका यांच्या अहवालानुसार, सोलापूर शहरात माहे ४ ऑक्टोबर, २०२१ अखेर एकूण ५४४ मोबाईल टॉवर असून त्यापैकी ३६५ टॉवर महानगरपालिकेच्या परवानगीने उभारलेले आहेत व १७९ मोबाईल टॉवर महानगरपालिकेची परवानगी न घेता उभारण्यात आल्याचे दिसून येते.
• महानगरपालिका सोलापूर यांच्या अहवालानुसार शहरातील महानगरपालिकेची परवानगी न घेता उभारण्यात आलेल्या १७९ टॉवर्सपैकी २१ST Century-९, Airtel-१७, ATC-७, BSNL-२९, Essar Infrastructure-१०, GTL Infrastructure-५, Indus-४५, Reliance Infocom Ltd-३१, Tower Vision-५, Vodafone-१० व WTTIL-११ मोबाईल टॉवर आहेत.
• सोलापूर महानगरपालिका हद्दीतील महानगरपालिकेची परवानगी न घेता उभारलेल्या १७९ मोबाईल टॉवर्सकडून आजमितीस कराची रक्कम एकूण रुपये १,२५,१८,६४२/- इतकी वसूल करण्यात आली असून उर्वरित अंदाजे थकबाकी रुपये २,५७,८६,४८०/- इतकी वसुल करण्याची कार्यवाही महानगरपालिकेकडून करण्याचे नियोजन आहे.

• तथापि, टॉवर ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रोव्हाइडर्स असोसिएशन व इतर यांनी मा.उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल केलेल्या रिट पिटीशन क्रमांक २०४३/२०१४ मध्ये मा.न्यायालयाने दिनांक १२ सप्टेंबर, २०१४ रोजी आदेश पारित करुन शासन व इतर स्थानिक प्राधिकरणानी मोबाईल टॉवर्स विरुद्ध कोणतीही दंडात्मक कार्यवाही (Coercive Steps) करु नये, असे निर्देश दिले आहेत. त्यामुळे महानगरपालिकेकडून टॉवर साईट सील करणे अथवा त्यांचा विद्युत पुरवठा बंद करणे शक्य झालेले नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इंडिया मेगा अग्रो अनाज कृष्णूर (ता. नायगाव जि. नांदेड)**
**या कंपनीने शेतकऱ्यांची केलेली फसवणूक**

**(३७) ३०१७४ (११-०६-२०२१). श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांची फसवणूक केल्याप्रकरणी इंडिया मेगा अग्रो अनाज कृष्णूर (ता.नायगाव, जि.नांदेड) या कंपनीवर गुन्हा दाखल करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी पोलीस अधीक्षक नांदेड यांना माहे जून, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नायगाव मतदार संघातील शेतकऱ्यांकडून या कंपनीने मोठ्या प्रमाणात सोयाबीन, हळद, चना इत्यादी खरेदी केलेल्या धान्याचे पैसे विशिष्ट कालावधी संपून अनेक महिने होऊनही अद्याप शेतकऱ्यांना दिले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार वरील निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कंपनीकडून शेतकऱ्यांची फसवणूक झाल्या प्रकरणाची दखल घेऊन तात्काळ गुन्हा दाखल करून धान्याचे पैसे देणे तसेच सदर कंपनीवर कारवाई होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२२-११-२०२१) :** (१) होय हे खरे आहे.
(२) व (३)
इंडीया मेगा अग्रो अनाज कृष्णूर (जि.नांदेड) या कंपनीला धान्य विक्री केलेल्या एकूण चोवीस शेतक-यांकडे चौकशी केली असता, कंपनीस विक्री केलेल्या धान्याचे पैसे टप्या टप्याने शेतक-यांना मिळत असल्याबाबतचे जबाब शेतक-यांकडुन नोंदविण्यात आलेले आहेत.

सदर कंपनीबरोबर व्यवहार केलेल्या कोणत्याही शेतक-याकडुन कंपनीविरुद्ध पोलीस स्टेशन, कुंटुर येथे तक्रार नोंदविलेली नाही.
सदर प्रकरणातील कोणत्याही पिडीत शेतकऱ्यांकडून तक्रार प्राप्त झाल्यास सदर कंपनीविरूध्द कायदेशीर कार्यवाही करता येईल.
(४) विलंब झालेला नाही.

---

**पालघर जिल्ह्यातील मजुरांना रोजगार हमी योजनेंतर्गत केलेल्या कामाची मजुरी मिळण्याबाबत**

**(३८) ३०३२२ (०९-०६-२०२१). श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील विविध ठिकाणी रोजगार हमी योजनेंतर्गत कामे सुरु करण्यात आली असून गेल्या वर्षभरापासून ज्या-ज्या मजुरांनी कामे केलेली आहेत त्यांची सुमारे २८ कोटी इतकी मजुरीची रक्कम शासनाकडून अद्याप मजुरांना अदा करण्यात आली नसल्याचे दिनांक २२ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कामांची मजुरी गरजू आदिवासी, कष्टकरी, कातकरी व अन्य कष्टकरी मजुरांना तात्काळ देण्यात यावी अशी मागणी तेथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी व कष्टकरी मजुरांनी माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार मजुरांना मजुरी अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संदीपानराव भुमरे (२५-११-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) माहे मार्च २०२१ अखेर पर्यंत सर्व मजूरांना EFMS प्रणालीद्वारे मजुरी तात्काळ अदा करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अनुसूचित जमातीच्या राखीव पदावरील नियुक्त्यांबाबत**

**(३९) ३०३८४ (१८-०६-२०२१). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जमातीसाठी सरकारी/निमसरकारी संस्थातील राखीव पदावरील असलेल्या नियुक्त्या जातवैधता प्रमाणपत्र अवैध ठरल्याने सदरच्या नियुक्त्या राज्य शासनाने ३१ डिसेंबर २०१९ पासून संपुष्टात आणल्याचे माहे जानेवारी २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पश्चिम विदर्भातील महादेव कोळी जमातीचे अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र जात पडताळणी समिती कडून अवैध ठरविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) उक्त प्रकरणी, शासकीय/निमशासकीय संस्था मधील सदरच्या अधिकारी/कर्मचारी यांचे सेवेस संरक्षण देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उद्धव ठाकरे (२३-११-२०२१) :** (१) हे खरे नाही.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दि. ६ जुलै, २०१७ च्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी दि. २१.१२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या कर्मचा-यांना मानवतावादी दृष्टीकोनातून तसेच प्रशासनाची होणारी अडचण दूर करण्यासाठी ११ महिन्याच्या कालावधीकरीता किंवा ते सेवेत राहिले असते तर ज्या दिनांकाला सेवानिवृत्त झाले असते त्या दिनांकापर्यत याआधी जे घडेल तोपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती मार्फत महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० व महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम २००३ मधील तरतूदीनुसार प्राप्त प्रकरणांची तपासणी करुन वैधता प्रमाणपत्र देण्याबाबत कार्यवाही करण्यात येते. अधिनियम २००० च्या कलम ८ नुसार अनुसूचित जमातीचा दावा सिध्द करण्याची जबाबदारी ही असा दावा करणा-या अर्जदारावर आहे.

(३) व (४) नाही.

अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या कर्मचा-यांच्या सेवा ११ महिन्या करीता अथवा त्याच्या सेवानिवृत्तीच्या दिनांक यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत अधिसंख्य पदावर वर्ग करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर (ता. राजुरा, जि.चंद्रपूर) अंतर्गत वनपरिक्षेत्रातील शेतकऱ्यांना शेतपिकांच्या नुकसानभरपाईची रक्कम मिळणेबाबत.**

**(४०) ३०६८६ (१८-०६-२०२१). श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर (ता. राजुरा, जि.चंद्रपूर) येथील मध्य चांदा वनविभाग, चंद्रपूर अंतर्गत येत असलेल्या वनपरिक्षेत्र विरुर परिसरातील तसेच इतरही वनपरिक्षेत्रातील शेतकऱ्यांना सन २०२०-२१ या वर्षात वन्यप्राण्यांकडून झालेल्या शेतपिकांच्या नुकसान भरपाईची रक्कम देण्याबाबत लेखी स्वरूपातील मांगणी माहे जून २०२१ वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधी व शेतकरी बांधवांनी उपवनसंरक्षक (मध्य चांदा वनविभाग, चंद्रपूर) यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वनपरिक्षेत्रातील मौजा-चिंचोली येथे सन २०२०-२१ या खरीप हंगामात चिंचोली बु. कविठपेट, धानोरा, सुब्बई व इतर परिसरात हिंस्त्र वाघांची दहशत होती, कित्येक गावांत वाघाने सामान्य नागरिक, पाळीव प्राण्यांवर प्राणघातक हल्ले केल्याने भीतीपोटी परिसरातील शेतकरी शेतातील पीक रक्षण करू शकले नाहीत, त्यामुळे जंगली डुकरापासून कापूस, सोयाबीन, तूर, चना इत्यादी पिकांचे अतोनात नुकसान झाल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोरोना महामारी संकटामुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या पूर्ण खचला आहे, सन २०२१-२२ खरीप हंगामाची सुरुवात झाल्याने बी-बियाणे व खतासाठी पैसे नसल्याने शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे तसेच मार्च महिन्यात मिळणारी नुकसानभरपाई अद्याप मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व चौकशीच्या अनुषंगाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत?

**श्री. उद्धव ठाकरे (१७-११-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) हे खरे नाही.

मध्य चांदा वनविभागातील विरुर वनपरिक्षेत्रात वाघ व इतर वन्यप्राण्यांचा वावर असल्याचे निदर्शनास आले आहे. मानव-वन्यप्राणी संघर्षाची घटना घडू नये म्हणून सदर क्षेत्रात वन कर्मचाऱ्यांमार्फत नियमीत गस्त करण्यात येते. तसेच सदर परिसरातील नागरीकांमध्ये जनजागृती करण्यात येते. वन्यप्राण्यांमुळे मनुष्य मृत्यु, पशुधन हानी व शेतपिकांचे नुकसान झाल्यास प्रचलित शासन निर्णयान्वये संबंधितास तात्काळ अर्थसहाय्य अदा करण्यात येते त्याकरीता उणे (-) प्राधिकरणाची सुविधा देखील उपलब्ध करुन देण्यात आली आहे.
(४) व (५) प्रश्न उदभवत नाही.

---

**मुंबईतील जोगेश्वरी व कुलाबा येथे बनावट कोरोना निगेटिव्ह अहवाल मिळत असल्याबाबत**

**(४१) ३०८५९ (१३-०७-२०२१). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील जोगेश्वरी येथील मेघवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत तसेच कुलाबा येथे मोबाईल व लॅपटॉपच्या सहाय्याने कोरोना पॉझिटिव्ह रुग्णांना अवघ्या हजार रुपयांत बनावट कोरोना निगेटिव्ह अहवाल दिला जात होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोरोना झाल्याचे कोणाला समजू नये म्हणून गावी-परप्रांती जाण्यासाठी काही जण असा बनावट अहवाल देत होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार कोरोनाचे बनावट अहवाल देण्या-यावर कारवाई करण्यासह असे प्रकार यापुढे घडू नये याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (१६-११-२०२१) :** (१) हे खरे नाही,
अशी लेखी तक्रार अद्याप प्राप्त झालेली नाही.
(२) हे खरे नाही,
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी स्वतंत्र कायमस्वरूपी सहाय्यक कामगार आयुक्त नेमण्याबाबत**

**(४२) ३२२१९ (०४-०८-२०२१). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त पद सद्य:स्थितीत रिक्त असून सांगली जिल्ह्याच्या सहाय्यक कामगार आयुक्त यांच्याकडे सिंधुदुर्ग जिल्ह्याचा प्रभारी पदभार देण्यात आला असल्याने सुरक्षा रक्षक व अन्य कामगारांचे विविध प्रश्न प्रलंबित राहिले आहेत, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी स्वतंत्र कायमस्वरूपी सहाय्यक कामगार आयुक्त नेमण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१६-११-२०२१) :** (१) हे खरे नाही,

सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये सहायक कामगार आयुक्त हे पद मंजुर नसुन सरकारी कामगार अधिकारी हे पद मंजूर आहे. सरकारी कामगार अधिकारी हे पद माहे ऑक्टोबर २०२० पासून रिक्त असुन सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार सरकारी कामगार अधिकारी, रायगड यांचेकडे देण्यात आलेला आहे. रत्नागिरी व सिधुदूर्ग या दोन जिल्ह्यासाठी सुरक्षा रक्षक मंडळ, रत्नागिरी हे कार्यरत आहे.

(२) सरकारी कामगार अधिकारी या संवर्गातील सरळसेवेने पदे भरण्यासाठी दि.२७.०९.२०२१ रोजी सामान्य प्रशासन विभागामार्फत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र पाठविण्यात आले आहे. त्यानुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दिनांक ०४.१०.२०२१ रोजी जाहिरात प्रसिध्द केलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मालडी (ता.मालवण, जि.सिंधुदूर्ग) येथे विद्युत कंपनीच्या कर्मचाऱ्यास कर्तव्यावर असताना कामकाजात अडथळा निर्माण केल्याबाबत**

**(४३) ३२२२१ (०५-०८-२०२१). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालडी (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील एका ग्रामस्थाने विद्युत कंपनीच्या कर्मचाऱ्यास कर्तव्यावर असताना शिवीगाळ आणि धमकी देवून शासकीय कामकाजात अडथळा आणल्याचे दिनांक १९ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित वीज कर्मचाऱ्याने या घटनेची तक्रार आचरा पोलीस ठाण्यात केली असता पोलीस ठाण्यातील संबंधित अधिकाऱ्यांनी तक्रार नोंदविण्यात अक्षम्य दिरंगाई केली असल्याचे, तसेच सदर प्रकरणी तातडीने शासकीय कामकाजात अडथळा आणल्याबाबतचा गुन्हा दाखल न करता तब्बल २२ दिवसांनी हेतुपुरस्सर केवळ अदखलपात्र गुन्हा दाखल केल्याचे निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी शासनाने केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे,

(४) असल्यास, सदर प्रकरणी दखलपात्र गुन्हा दाखल करून घेण्यात अक्षम्य दिरंगाई करणाऱ्या आचरा पोलीस ठाण्यातील संबंधित अधिकाऱ्यांवर, तसेच शासकीय कामात अडथळा आणणाऱ्या संबंधित इसमाविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२२-११-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी तक्रारदार यांनी दिनांक ११.०६.२०२१ रोजी दिलेल्या तक्रारीस अनुसरुन आचरा पोलीस ठाणे येथे अदखलपात्र ग.ु र.नं. ५३/२०२१ कलम ५०४, ५०६ भादंवि अन्वये नोंदविण्यात आला असून विरोधकास कलम १४९ फौ.प्र.सं. अन्वये नोटीस देवून शांतता राखणेची समज देण्यात आली आहे.
(३) व (४) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, शाखा कणकवली यांनी दिलेल्या माहितीवरुन तक्रारदार हे शासकीय नोकर अथवा लोकसेवक या संज्ञेत मोडत नसून दखलपात्र स्वरुपाचा गुन्हा दाखल होत नसल्याने त्यांचे तक्रारीस अनुसरुन अदखलपात्र गुन्हा नोंदविण्यात आला व तक्रारदार यांना मा.न्यायालयात दाद मागण्याची लेखी समज देण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**समृद्धी महामार्गाच्या नागपूर ते शिर्डी पहिल्या टप्प्यातील वाहतुकीबाबत.**

**(४४) ३२२७४ (०२-०९-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) : तारांकित प्रश्न क्रमांक २१८३७ ला दिनांक २ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र समृद्धी मार्गाच्या नागपूर ते शिर्डी या पहिल्या टप्प्यातील रस्त्यावरून दिनांक १ मे, २०२१ रोजी वाहतूक सुरु करण्याची घोषणा मा. मुख्यमंत्री यांनी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर ते शिर्डी या ५२० कि.मी. लांबी असलेल्या महामार्गाचे काम ११ ई.पी.सी. (E.P.C.) ठेकेदारांना देण्यात आलेले असून, सदरहू काम नियोजित वेळेत पूर्ण केले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रस्त्याच्या कामाची गती वाढवून महाराष्ट्र समृद्धी मार्गाच्या नागपूर ते शिर्डी या पहिल्या टप्प्याच्या वाहतूकीचे काम सत्वर होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-११-२०२१) :** (१) होय.
(२) अंशतः खरे आहे,
कोव्हिड - १९ च्या प्रादुर्भावामुळे या सर्व पॅकेजमध्ये काम पुर्ण होण्यास वेळ लागत आहे, तथापि, सदर कामे ही युध्दपातळीवर पुर्ण करण्यात येत आहेत.
(३) सदर पहिल्या टप्प्याची कामे कोव्हिड - १९ च्या निर्देशांच्या अधिन राहून देण्यात आलेल्या वाढीव मुदतीत युध्दपातळीवर प्रयत्न करुन पुर्ण करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिखली नगरपरिषदेमधील रोजंदारीवरून कायम झालेले सफाई कामगारांना लाड पागे समितीच्या अनुसार वारसाहक्काने नोकरी मिळणेबाबत**

**(४५) ३२२७९ (०१-०९-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील चिखली नगरपरिषद येथे पंधरा ते वीस वर्षे रोजंदारीने काम केलेल्या सफाई कामगारांना दिनांक २४ जानेवारी १९९६ चे आदेशानुसार १ फेब्रुवारी, १९९६ रोजी कायम करण्यात आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेहतीस रोजंदारी कर्मचाऱ्यांना वारसाहक्काने समितीच्या शिफारसीनुसार नोकरीसुद्धा देण्यात आली परंतु नगरपालिका प्रशासनाच्या दिनांक २६ ऑक्टोबर, २००६ नुसार रोजंदारी ने कायम झालेल्या कर्मचाऱ्यांना वारसाहक्काने नाकारण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रोजंदारी कर्मचाऱ्यांना सुद्धा लाड पागे कमिटीच्या शिफारशी लागू करून त्यांनासुद्धा कायम करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २२ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास करुन यासंदर्भात बैठक आयोजित करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-११-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२)

• सदरच्या कर्मचाऱ्यांपैकी ४ कर्मचारी मयत झाल्यानंतर त्यांच्या वारसांना नगरपरिषदेने सफाई कामगार पदावर नेमणूक दिली होती.

• राज्यातील नगरपरिषदांमध्ये विहित कार्यपद्धतीचा अवलंब न करता नियुक्त करण्यात आलेल्या सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना लाड कमिटीच्या शिफारशी लागू नसल्याचे नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडून दिनांक २३ मार्च, २००६ रोजी परिपत्रक निर्गमित करण्यात आले. त्यानुसार सदरच्या ४ कर्मचाऱ्यांची झालेली नियुक्ती रद्द करण्यात आली.

• याबाबत संबंधीत कर्मचाऱ्यांकडून मा.उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या रिट पिटीशनमध्ये मा.न्यायालयाने दिनांक ९ मार्च, २०२० रोजीच्या आदेशान्वये अर्जदार यांची विनंती नाकारली आहे.

(३) व (४)

• ज्या सफाई कामगारांची विहित कार्यपद्धतीचा अवलंब न करता रोजंदारीवर नियुक्ती झाली आहे, अशा कर्मचाऱ्याच्या वारसांना लाड पागे समितीच्या शिफारशी लागू होतील किंवा कसे, याबाबत निर्णय घेण्याची सामाजिक न्याय विभागाकडून कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्ह्यामध्ये कोरोना पॉझिटिव्ह मृतांच्या अत्यंसंस्कारासाठी वापरण्यात येणारे पीपीए किट निकृष्ट असल्याबाबत**

**(४६) ३२३०० (०१-०९-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यामध्ये कोरोना पॉझिटिव्ह मृतांच्या अत्यंसंस्कारासाठी वापरण्यात येणारी कीट अतिशय निकृष्ट असल्याची धक्कादायक बाब दिनांक १३ एप्रिल, २०२० रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पीपीए किटमध्ये गैरव्यवहार झाल्याने याबाबत बुलढाणा नगरपालिकेच्या काही नगरसेवकांनी पीपीए किट चांगल्या दर्जाची तसेच किटमध्ये पूर्ण साहित्य देण्याची मागणी केली होती हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-११-२०२१) :**

(१) अशा आशयाचे वृत्त दिनांक १३ एप्रिल, २०२० रोजी दैनिक दिव्यमराठी या वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाले होते. मात्र याबाबत नगरपरिषदेकडे कोणतीही लेखी तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) व (३)

• अशा आशयाची कोणतीही मागणी नगरसेवकांनी केली नसल्याचे नगरपरिषदेने कळविले आहे.

• नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांचा कोरोना कोविड पासून बचाव व्हावा या दृष्टीकोनातून तातडीची बाब म्हणून अल्पमुदतीची निविदा मागवून दिनांक २७/३/२०२० रोजी दैनिक सायरान या वर्तमानपत्रात निविदा प्रसिद्धीची कार्यवाही करण्यात आली. त्यातील न्यूनतम दराची अध्यक्ष राजधानी सप्लायर्स यांची निविदा मान्य करुन त्यांच्याशी दिनांक ७/४/२०२० रोजी करारनामा करुन घेऊन दिनांक ७/४/२०२० रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आलेले असून त्यांचेकडून PPE किटचा पूरवठा करण्यात आला आहे. एकूण खरेदी किंमत रुपये २,४४,५२९/- इतकी असून त्यामध्ये गैरव्यवहार झाल्याचे दिसून येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्ह्यामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये कोविड केअर सेंटर सुरू करणेबाबत**

**(४७) ३२३०४ (०५-०८-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यभरासह बुलढाणा जिल्ह्यामध्ये कोरोना संसर्गाचा प्रादूर्भाव वाढत असून आरोग्य व्यवस्था अपुऱ्या पडत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये कोविड केअर सेंटर सुरू करा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३ मे २०२१रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्याकडे केली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (१५-११-२०२१) :** (१) हे खरे नाही,

(२) हे खरे आहे.

परंतू राज्यासह बुलढाणा जिल्हयामध्ये कोवीड साथीच्या नियंत्रणाकरिता कोवीड केअर सेंटर, डेडीकेटेड कोवीड हेल्थ सेंटर व डेडीकेटेड कोवीड हॉस्पीटल अशी त्रिस्तरीय रचना दिनांक १एप्रिल २०२० च्या शा.निर्णयान्वये निर्माण केलेली आहे. बुलढाणा जिल्हयामध्ये कोवीड रुग्णांच्या उपचाराकरिता कोवीड केअर सेंटर-२५, डेडीकेटेड कोवीड हेल्थ सेंटर - ५८व डेडीकेटेड कोवीड हॉस्पीटल-१७ असून त्यामध्ये रुग्णांसाठी ५१५३ बेड उपलब्ध आहेत. त्यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्राचा कोवीड रुग्णावर उपचार करण्यासाठी समावेश करू नये अशा मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्हयातील पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने कंत्राटी कामगार ऐवजी महानगरपालिकेच्या मंजूर आकृतीबंधानुसार कायमस्वरूपी कामगार भरती प्रक्रिया राबविण्याबाबत

**(४८) ३२३०८ (०१-०९-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमार्फत घनकचरा गोळा करणाऱ्या गाडीवरील कंत्राटी कर्मचारी, सुरक्षा विभाग, आरोग्य व सफाई कामगार, वैद्यकीय सेवा, विदयुत, शिक्षण मंडळ, क्रीडा, मुख्य कार्यालय, पाणीपुरवठा, झो.प.नु. स्थापत्य, रस्ते विभाग, स्मार्ट सिटी इत्यादी विभागात कुशल, अर्धकुशल, अकुशल, शिकाऊ कामगार कंत्राटी पद्धतीने महानगरपालिकेकडून ठेकेदारांमार्फत नेमले जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक ठिकाणी कमी कामगार नेमून जास्त कामगारांचे नावे दाखवून ठेकेदारांमार्फत महानगरपालिकेची आर्थिक फसवणूक केली जात असल्याचे तसेच अनेक विभागात कंत्राटी कामगार पूर्ण क्षमतेने व पूर्ण वेळ काम करत नसून व अनेक ठेकेदार कंत्राटी कामगारांना समान काम समान वेतन धर्तीवर वेतन व भत्ते देत नसल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणावर निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेमार्फत सर्व विभागात कंत्राटी कर्मचाऱ्यांची भरती होत असल्याने राज्य घटनेतील वंचित समाजाच्या आरक्षणाच्या टक्केवारीनिहाय समाजातील इतर मागासवर्गीय (OBC), मागासवर्गीय (BC), अनुसूचित जाती (SC) - अनुसूचित जमातीच्या (ST) वर्गाच्या तरुण बेरोजगारांना सामाजिक न्याय प्राप्त होण्यापासून वंचित राहावे लागत असल्याचेही निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने कंत्राटी कामगार ऐवजी महानगरपालिकेच्या मंजूर आकृतीबंधानुसार कायमस्वरूपी कामगार भरती प्रक्रिया राबवून इतर मागासवर्गीय (OBC), मागासवर्गीय (BC) अनुसूचित जाती (SC) - अनुसूचित जमातीच्या (ST) वर्गाच्या तरुण बेरोजगारांना सामाजिक न्याय देण्यासाठी लोकप्रतिनिधी, चिंचवड यांनी दिनांक ५ जानेवारी, २०२१ रोजी आयुक्त, महानगरपालिका यांच्याकडे लेखी पत्राद्वारे मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, महानगरपालिकेच्या सर्व विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या भरतीऐवजी शासनाने मंजूर केलेल्या आकृतीबंधानुसार महानगरपालिकेमध्ये कायमस्वरूपी कामगार भरती प्रक्रिया राबविण्याबाबत तसेच पिंपरी-चिंचवड आयुक्त, महानगरपालिका यांच्याकडे कंत्राटी पद्धतीने महानगरपालिकेसाठी सेवा देणाऱ्या कामगारांवर दरमहा होणाऱ्या सर्व प्रकारच्या वेतन व मानधनावरील खर्च व कंत्राटी कामगारांची एकत्रित संकलित माहिती उपलब्ध होण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वेळोवेळी दिनांक १४ जानेवारी, २०२०, दिनांक २४ सप्टेंबर, २०२० व दिनांक ५ जानेवारी, २०२१ रोजी वा त्या सुमारास लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कंत्राटी पद्धतीने ठेकेदारांमार्फत महानगरपालिकेसाठी सेवा देणाऱ्या सर्व विभागातील कामगारांवर दरमहा होणाऱ्या सर्व प्रकारच्या वेतन व मानधनावर खर्चाची संकलित माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच मंजूर केलेल्या आकृतीबंधानुसार महानगरपालिकेमध्ये कायमस्वरूपी कामगार भरती प्रक्रिया राबविण्याबाबत शासनाच्यावतीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-११-२०२१) :** (१) होय, खरे आहे
(२)
• संबंधीत ठेकेदारांकडून त्यांना निश्चित करून दिलेल्या संख्येत कामगार उपलब्ध करून देण्यात येत असून या कामगारांकडून पूर्ण वेळ काम करून घेण्यात येते.
• तसेच पुणे महानगरपालिकेत कार्यरत कंत्राटी कामगारांना किमान वेतन दराने वेतन/भत्ते त्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात येत असल्याचे आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी कळविले आहे.
(३)
• सद्य:स्थितीत महानगरपालिकांमध्ये नियमित स्वरूपाची सरळसेवेन नोकर भरती करण्यास राज्य शासनाने निर्बंध घातलेले आहे.
• त्यामुळे तात्पुरती सोय या दृष्टीकोनातून कंत्राटी कर्मचाऱ्यांची भरती करण्यात येते. तथापि, सरळसेवेने भरतीच्या वेळी शासनाच्या नियमानुसार आरक्षण किंवा अस्तित्वात असलेल्या अन्य सर्व भरती नियमांचे पालन करण्यात येते.
(४) मा.विधानसभा सदस्य, चिंचवड यांनी जानेवारी, २०२१ चे पत्र दिलेले आहे, हे खरे आहे.
(५) होय, हे खरे आहे.
(६)
• दि.२०.०३.२०२० च्या शासन पत्रान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर आकृतीबंधातील वैद्यकीय व आरोग्य सेवेतील एकूण ३४४ पदे भरण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.
• तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस सरळसेवा पदभरती निर्बंधातून सूट देण्याच्या अनुषंगाने नगरविकास विभागामार्फत प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आलेला आहे.
• मा.विधानसभा सदस्य, चिंचवड यांनी मागणी केलेली माहिती पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रशासनामार्फत दि.०६.०१.२०२१ व दि.१०.०३.२०२१ च्या पत्रान्वये देण्यात आलेली असल्याचे, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी कळविले आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

**राज्यातील जिल्हा परिषदांना त्यांच्या हक्काचा निधी वेळेत देणेबाबत**

**(४९) ३२३५१ (०४-०८-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषदांना मुद्रांक शुल्क अनुदान व पंचायत समितीच्या अंदाज पत्रकाचा महसूल उपकर अनुदान आहे तसेच राज्यातील सर्व अंदाजपत्रक असणारी पुणे, जिल्हा परिषदेला गेल्या आर्थिक वर्षात मूळ अंदाजपत्रकाच्या ३३ टक्के प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या मुख्य कणा असलेल्या मुद्रांक शुल्क व महसूल शुल्क अनुदान पूर्ण उपलब्ध न झाल्याने राज्यातील सर्व जिल्हा परिषद व पंचायत समित्या या निधीअभावी अडचणीत आल्या आहेत व राज्यातील अनेक जिल्हा परिषद यांना सदर निधी न मिळाल्याने मोठ्या प्रमाणावर नागरिकांना मूलभूत पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यास व विकास कामे होण्यास परिणाम होत आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाकडून हक्काचा निधी न मिळाल्यामुळे राज्यातील अनेक जिल्हा परिषद स्वनिधी, झेडपी फंड शून्यावर आले आहेत हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन पुणे जिल्हा परिषदेच्या मुद्रांक शुल्क अनुदानस राज्य सरकारकडून रु.५१५ कोटीची थकबाकी वितरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, जिल्हा नियोजन समित्यांना विकासासाठी मुबलक निधी उपलब्ध करून देत असताना दुसरीकडे जिल्हा परिषद यांना त्यांच्या हक्काचा निधी वेळेत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. हसन मुश्रीफ (२४-११-२०२१) :** (१) व (२) अंशतः खरे आहे. कोरोना विषाणूमुळे उध्दवलेल्या परिस्थितीत वित्त विभागाकडून कमी प्रमाणात निधी उपलब्ध झाला. सदर प्राप्त निधी पूर्णपणे वितरीत करण्यात आला.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) याबाबत वित्त विभागास पाठपुरावा चालू आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बृहन्मुंबई महापालिका आयुक्तांनी त्यांना नसलेल्या अधिकाराचा वापर करून दोषी सहायक आयुक्त व अधिकाऱ्यांना देण्यात आलेली शिक्षा कमी केल्याबाबत.**

**(५०) ३२३९० (०२-०९-२०२१). श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोअर परळ मुंबई येथील कमला मिल कंपाऊंड मधील “वन अबव्ह आणि “मोजोस ब्रिस्टो या दोन रेस्टोपबमध्ये दिनांक २९ डिसेंबर, २०१७ रोजी लागलेल्या भीषण आगीत १४ जणांचा मृत्यू व ५४ जण जखमी झाले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दुर्घटनेच्या अनुषंगाने आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी केलेल्या चौकशीमध्ये दोन सहायक आयुक्तांसह १२ अधिकारी / कर्मचारी दोषी आढळून आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महापालिका आयुक्तांनी सदर दोन्ही सहायक आयुक्त व अधिकारी दोषी आढळल्यामुळे सहायक आयुक्तांची कायमस्वरूपी वेतनवाढ रोखून धरण्याचे व काही अधिकाऱ्यांना निलंबित करण्याचे आदेश पारीत करून शिक्षादेश बजावले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी आग लागल्यानंतर ज्या आयुक्तांनी चौकशी केली त्याच आयुक्तांनी दोन्ही सहायक आयुक्तांची कायमस्वरूपी वेतनवाढ थांबवली होती व काही अधिकाऱ्यांना निलंबित केले असतांना, या शिक्षेमध्ये नंतर आलेल्या महापालिका आयुक्तांनी शासनाची परवानगी न घेता दोन्ही सहायक आयुक्तांची शिक्षा कमी करून व निलंबित अधिकाऱ्यांना पुन्हा सेवेत घेऊन पाठीशी घालण्याचे काम केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी त्या वेळच्या आयुक्तांनी बजावलेले शिक्षादेश त्यानंतर आलेल्या आयुक्तांनी त्यांना नसलेल्या अधिकाराचा वापर करून शिक्षा कमी केली व निलंबित अधिकाऱ्यांना पुन्हा सेवेत घेतल्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(६) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व चौकशी अहवालाच्या अनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-११-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी तत्कालीन महानगरपालिका आयुक्तांच्या आदेशानुसार एकूण ६ कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले होते. सदर चौकशी प्रकरणी ६ निलंबित व इतर ६ अशा एकूण १२ अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द चौकशी करण्यात आली. चौकशीअंती तत्कालीन महानगरपालिका आयुक्तांनी खालीलप्रमाणे आदेश पारित केले होते:-

• २ सहायक आयुक्त व १ उप कार्यकारी आरोग्य अधिकारी यांची पुढील देय वेतनवाढ कायमस्वरुपी रोखण्यात यावी.

• २ सहायक अभियंता यांच्या पुढील पाच देय वेतनवाढी कायमस्वरुपी रोखून धरण्यात याव्यात.

• १ सहायक अभियंता, १ कनिष्ठ अभियंता व १ वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांना महानगरपालिका सेवेतून काढून टाकण्यात यावे.

• १ सहायक विभागीय केंद्र अधिकारी यांना पदावनत करण्यात यावे.

• १ केंद्र अधिकारी, १ दुय्यम अभियंता व १ स्वच्छता निरीक्षक यांना त्यांच्या पदाच्या पहिल्या वेतनावर आणण्यात यावे.

(४), (५) व (६) पुढील देय वेतनवाढ कायमस्वरुपी रोखण्यात आलेले २ सहायक आयुक्त व पुढील पाच देय वेतनवाढी कायमस्वरुपी रोखून धरण्याची शिक्षा झालेल्या २ सहायक अभियंत्यांपैकी १ सहायक अभियंता यांनी सदर शिक्षादेशाविरुध्द अपील सादर केले.

सदर प्रकरणी सुनावणीअंती २ सहायक आयुक्तांच्या शिक्षेत अंशत: बदल करुन ती हंगामी स्वरुपात रोखून धरण्यात यावी असा बदल करण्यात आला.

तसेच, १ सहायक अभियंत्याच्या शिक्षेत अंशत: बदल करुन त्यांची पुढील वेतनवाढ दोन वर्षांकरिता हंगामी स्वरुपात रोखून धरण्यात यावी असा बदल करण्यात आला.

तसेच, उर्वरित शिक्षादेश ही "जबर शिक्षा" या प्रकारात मोडत असल्याने, संबंधितांवर "कारणे दाखवा" नोटीस बजावण्यात येऊन, त्यांच्याकडून प्राप्त झालेल्या अभिवेदनानंतर नमूद शिक्षा कायम करावी किंवा कसे याबाबतचा प्रस्ताव आयुक्तांना सादर केला असता, ३ कर्मचाऱ्यांनी केलेल्या वैयक्तिक सुनावणीच्या अनुषंगाने आयुक्तांनी त्यांच्या शिक्षेबाबत खालीलप्रमाणे आदेश पारित केले:-

- १ कनिष्ठ अभियंता यांना महानगरपालिका सेवेतून काढून टाकण्याऐवजी, त्यांचे मूळ वेतन ४ टप्प्यांनी कायमस्वरुपी कमी करण्यात यावे.
- १ सहायक अभियंता यांना महानगरपालिका सेवेतून काढून टाकण्याऐवजी, त्यांना दुय्यम अभियंता या पदावर पदावनत करण्यात यावे आणि त्यांना सहायक अभियंता या पदावर पदोन्नती मिळाली नसती तर त्यांना पदोन्नतीच्या दिनांकाला जेवढे वेतन अनुज्ञेय झाले असते, त्या वेतनावर त्यांची वेतननिश्चिती करण्यात यावी.

तथापि, १ वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांना पुन:श्च सुनावणी घेऊन आदेश पारित करण्यात येतील असा निर्णय अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) व अतिरिक्त आयुक्त (शहर) यांनी संयुक्तिकपणे घेतला असून, १ वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्या शिक्षेचा निर्णय प्रलंबित आहे.

सदर आदेशानुसार १ कनिष्ठ अभियंता व १ सहायक अभियंता यांची कोविड-१९ कर्तव्यार्थ तात्पुरत्या स्वरुपात केलेली पुन:स्थापना कायमस्वरुपी पुढे सुरु ठेवण्यात आली असून, १ वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्या शिक्षेबाबत अंतिम निर्णय झालेला नसल्याने, त्यांना कोविड-१९ कर्तव्यार्थ तात्पुरत्या स्वरुपात कामावर घेण्यात आले आहे.

१ स्वच्छता निरीक्षक यांना त्यांच्या पदाच्या पहिल्या वेतनावर आणण्याची "कारणे दाखवा नोटीस" मध्ये नमूद शिक्षा कायम करण्यात आली.

६ निलंबित कर्मचाऱ्यांपैकी १ सहायक विभागीय केंद्र अधिकारी, १ केंद्र अधिकारी व १ दुय्यम अभियंता यांना सदर दुर्घटनेनंतर पोलीसांनी अटक केल्यामुळे त्यांना कायमस्वरुपी पुन:स्थापित न करता, कोविड-१९ च्या कर्तव्यार्थ तात्पुरत्या स्वरुपात पुन:स्थापित करण्यात आली आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

---

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** **प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.